डॉ. नितीन मोरे

तेवढं सोडून बोला



एकपात्री
नाटक

तेवढं सोडून बोला

(एकपात्री नाटक संग्रह)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

तेवढं सोडून बोला

हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा. सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

तेवढं सोडून बोला

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन :- १८ जुलै २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे एकोणचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

तेवढं सोडून बोला

डॉ. नितीन मोरे

तेवढं सोडून बोला

अनुक्रम

१ सांगतो ऐका..
२ एका कुंभाराने..
३ तेवढे सोडून बोला!
४ माझ्या कातडीची गोष्ट..
५ बोलकी बाहुली!
६ नमुना!
७ वाईच जादाच भाऊ ही लोकशाही..
८ कळसूत्री
९ रंग बदलती..
१० होकायंत्री
११ देशद्रोही..
१२ उत्क्रांतीकडे..
१३ कारण..
१४ कोणी खुर्ची देता का खुर्ची..
१५ घरानेशाही..

१६ जो जीता..
१७ एक्झाम गोइंग..
१८ मी.. मोहरलेला मोहरा..!
१९ मानव तितुका..
२० सत्यमेव जयते!
२१ कायद्याचे बोल..
२२ बकरे पाहिजेत..
२३ मी.. नंदी!
२४ प्रश्न न पडती मजला..
२५ धुरळा
२६ पंटर नं.वन
२७ बोले तैसा चाले
२८ उचलली जीभ..
२९ मी.. लोकशाही!
३० वंगण
३१ आम्ही चमच्यांच्या फौजा..
३२ सत्य..
३३ इन्स्टंट देशभक्त

सांगतो ऐका..

ऐका..

एका गावी होता एक भोळा बजरंग

बघायचा न इकडे तिकडे न्यारा त्यांचा रंग..

नमस्कार.. रामराम मंडळी..

ऐका म्हनलं की डफावर थाप पडते नि तोंडातनं आपसूक ओळी फुटत्यात. पन बजरंगास ठावं हाये.. हा फड न्हाई अन् निसताच तमाशा हाये! तवा समदे कान द्यून..

सांगतो आईका!

तर मंडळी, हा बजरंग कोन म्हनून काय पुसता? म्या असेन लाडका.. द्येवाचा..

म्हंजे डायरेक्ट तो आकाशातला न्हवं.. तर हा लोकल द्येव..

म्हंजे आपले ह्ये पाटील.. आनि म्या पाटलांचा लाडका!

लै कामाचा मानूस म्या.. कामाचा म्हंजे..

हरकाम्या..

घरकाम्या..

कोन रे तो म्हनतो..

सांगकाम्या?

तर पाव्हनं.. म्या बजरंग..

पाटलांचा डावा हात जनू..

तसा उजवा हात म्हनायची पध्धत असतेया ठावं हाये.. पन आपले मालक.. पाटील पडले डावखुरे! तवा म्या डावा हात!

न्हाई न्हाई ..

राजकारनातील डावा न्हाई ..

आन डाव्या उजव्यातला डावा न्हाई.

निसताच डावा हात .. मालकांसाठी खाता हात म्हना..

अन काय!

खाता हात म्हंजे ..

उगाच वायफळ इचार नका करू.. त्यासाठी मालकांची वेगळी मानसं हायेत.

.. इथं डावा हात म्हंजे .. मालक डाव्या हातानंच कोबंडी चापत्यात..

तर तुमाला म्हनून सांगतोया..

म्या म्हंजे बजरंग! मालकांचा डावा हात!

झाडावरलं पान न्हाई हालत वाऱ्याबिगर आन मालकाचं पान हालत न्हाई माझ्याबिगर.. आसं लोकं कायबाय बोलत असत्यात ..

तसं वावगं न्हाई त्यात कायबी.. पन समद्याच गोश्टी कोन बोलतं का? आन राजकारनात तर न्हाईच न्हाई.

मालक म्हनतात त्ये ह्येच.. कुटं काय बोलावं नि कुटं काय बोलू नये हे उमगलं की राजकारन निम्मे सर झालंच समजा!

आसल बी.

मालक म्हनतात म्हंजे ते बरोबरच असाया पाह्यजे..

हा बजरंग मालकांकडे पंध्रा वर्ष हाये.. त्यात शिकला काय?

तर एकच गोश्ट..

मालक म्हनतात ती पूर्व दिशा.

मालक म्हनतात ते खरं आन तेच खरं.

मालकांचं कदी काय बी चुकत नसतं..

बजरंगाने त्यात डोकं वापरायचं नसतं..

तर मालकांपाशी दोन लोक सदा असत्यातच..

मालक कुटं बी आसले तरी..

एक म्या.. आन

मालकांचा इमानी ढाण्या कुत्रा.. पायाशी गोंडा घोळत आसतो.. तो.

तर सांगत व्हतो ते या बजरंगाबद्दल..

मालकांच्या पायी औक्ष वाह्यलं.. सार्थक झालं..

मालक म्हनतात बी..

पूरी दुनिया साथ सोडंल.. पन हा बजरंग कदीच न्हाई सोडून जानार..

म्या मालकांचे समदे आइकत असतो.. मालकांना त्याचं अप्रूप..

असला निष्ठावान कोनी दुसरा न्हाई म्हनतात मालक..

मालक आसं म्हनतात यातच समदं आलं..

राजकारनाचा तमाशा समदा सुरू आसतो.. मालकांचे साथीदार कितीक आपापल्या पोळीवर पळीभर तूप ओतून घ्यून अजून मिळायच्या आशेनं सोडून गेले. काही गुळाच्या ढेपेस मुंगळे चिटकावेत तसे यून चिकटले..

पन म्या आन ढाण्या .. दोगं जितल्या तिथं..

तुम्हाला त्येच सांगायचं व्हतं..

आमच्या जिंदगानीची कथा.. नि कहानी..

ती मालकांच्या पायी सुरू नि तिथंच संपते बी..

अजून सांगनं न्हाई आन मागनं बी न्हाई ..

मालकांना सोडून वेगळं काय बोलला असेल बजरंग आजवर त्ये ह्येच..

आयकून घेतलं समद्यांनी..

त्याबद्दल काळजापासून धन्यवाद..

नमस्ते ..

एका कुंभाराने ..

कुंभार मी.

फार पूर्वी कोणी सांगून गेलेत.. कुंभार बना.. गाढवांची कमी नाही!

मग घेतलं मनावर.

म्हणजे शहाणे सुरते आपले पूर्वज..

त्यांचे ऐकायला पाहिजे.

ते काय म्हणाले होते..

सॉरी, पूर्वज म्हणजे त्या अर्थाने माकड वगैरे पूर्वज नाहीत. तर बडे बुजुर्ग वगैरे.

तर त्यांनी हे सांगून ठेवलेच आहे ना..

मातीत लोळा.. मातीत खेळा.. मातीतून मडकी घडवा..

म्हणजे थोडक्यात कुंभार व्हा!

मग आपली गाडगी मडकी वहायला गाढवांना तोटा नाही!

गंमत काय आहे ना..

आपल्यापैकी काही थोडेच कुंभार नि बाकी बहुतेक गाढवं.. अगदी तोच पूर्वजांनी दिलेला सल्ला सर्वांसाठी एकच असला तरीही!

काय आहे, संत महात्मे सांगून जातात, उपदेश करतात.. तो सर्व जणांसाठी.

तो ऐकणारे?

संतवचन ऐकून कुणी संत होत असते तर सारी दुनियाच संत सज्जनांनी भरली असती. दुर्जन औषधालाही सापडला नसता..

तर मुद्दा तो नाही .. सांगायचे ते हे की बुजुर्गांचे सल्ले ऐकूनही गाढवेच फार.. कुंभार कमी!

पण आम्ही शहाणे.. दुसऱ्या वर्गातले..

कुंभार!

काय म्हणता?

मडकी बनवतो आम्ही?

आजकाल मातीचे माठ कोणी घेत नाही म्हणता?

नसतील घेत..

तुम्ही फारच शब्दार्थाने अर्थ काढता बुवा.. वाच्यार्थ समजून घ्या.

अहो, आम्हाला काय वेड लागलंय?

कुंभाराचे उत्पन्न ते काय..

आणि आमची गाडी पाहताय की नाही? लांबलचक! वर सरकारी!

म्हणजे जनसेवेसाठी जनकल्याणाच्या कामासाठी जनता जनार्दनाच्या पैशांतून आम्हाला खास मिळालेली.

अहो, याचसाठी तर केला होता जनसेवेचा अट्टाहास ..

पण सांगायचे ते हे नाही ..

आम्ही बनलो कुंभार .. मग ध्यानात आले..

कुंभाराचे कुंभारपण त्याच्या मातीत नाही .. त्याने घडवलेल्या गाडग्या मडक्यांत नाही..

तर ते आहे त्याच्या पदरी बांधलेल्या गाढवांत!

जेवढी गाढवे जास्त तितका कुंभार हुशार ..

किंबहुना

जितका चलाख कुंभार तितकी गाढवे जास्त!

आम्ही तर पाहून ठेवलेय..

कुंभाराकडे गाढव म्हणून काम करायला गाढवांच्या रांगा लागतात रांगा .. गाढवा गाढवांतही गाढवपणाची स्पर्धा होते म्हणे!

कशातही स्पर्धा करतात .. गाढव कुठचे!

पण स्पर्धा असणारच!

जितका हुशार कुंभार तितका तो गाढवप्रिय होणारच!

आणि अजून एक..

कुंभारास आपले कौशल्य दाखवायचे असेल तर त्याने पदरी अशी गाढवे नुसती बाळगलीच पाहिजेत असे नाही..

.. तर त्यांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे ..

तर हा गाढव संवर्धन कार्यक्रम कुंभारांनीच नाही राबवायचा तर कोणी राबवावा?

आणि संवर्धन म्हणजे ..

गाढवांची क्वालिटी आणि क्वांटिटी दोन्ही वाढवायला हव्यात ..

तर अशी क्वालिटेटिव्ह नि क्वांटिटेटिव्ह गाढवे वाढली की कुंभाराची चलती..

आम्ही तर पूर्वजांच्याही पुढे जाऊन म्हणतो ..

कुंभार व्हा.. गाढवांना तोटा नाही ..

पण इथवरच थांबू नका..

कुंभार व्हा नि गाढवे वाढतील असे पहा..

म्हणजे पहा..

कसे कुंभारांचे आयुष्य सफल आणि सुफल संपूर्ण होते की नाही ते!

तेवढे सोडून बोला!

बोला ना तुम्ही.

बोलायला न पैसे पडत, न ऐकायला ..

तेव्हा बोला. बोलाच..

पण तेवढे सोडून बोला..

म्हणजे काय आहे ना, तुमचे स्वातंत्र्य मान्य आहे.

अभिव्यक्ती का काय म्हणतात ते..

भाषण स्वातंत्र्य, बोलण स्वातंत्र्य असे काय काय स्वातंत्र्याचे प्रकार आहेत म्हणतात.

सगळे मान्य.

त्यामुळे बोला तुम्ही. बिनधास्त बोला..

पण तेवढे सोडून.

नाही म्हणजे तुमचे विचार तुम्ही मांडा.

मांडायलाच हवेत.

मांडायला हवेतच.

याबाबतीत दुमत होण्याबद्दलही दुमत नाही.

निर्भिडपणे मांडा विचार.

व्यक्त व्हा असे काहीतरी म्हणतात तसे व्हा. होऊनच जा.

अगदी बिनघोर ..

बोला. बोलत रहा..

पण एकच ध्यानात ठेवा..

तेवढे सोडून बोला.

काय आहे मतमतांतरे व्यक्त केलीत तरच ठाऊक होतात.

विचारांचे अभिसरण व्हायलाच हवे..

वादे वादे जायते.. असे काहीतरी म्हणतात.

हे सगळे व्हायचे तर तुम्ही बोललेच पाहिजे. आणि बोलले पाहिजेच.

तेव्हा बोला.

न भिता, न घाबरता..

मनातील सर्व बोलून टाका.

फक्त एकच.. तेवढे सोडून बोला.

आमचे काय आहे ना..

आम्ही सारे ऐकून घेतो. कुणाला बोलायचे असेल तर उगाच अडवत नाही आम्ही.

पण शब्द शस्त्राहून ताकदवान आहे हे मात्र आम्ही विसरत नाही.

अहो, शब्द ताकदवान असेल तर शाब्दिक हिंसा होणार की नाही?

.. आणि अहिंसा हाच परम धर्म..

तेव्हा तुम्ही बोला.

बोलाच. बोलून टाकाच..

पण फक्त

.. तेवढे सोडून बोला..

तुम्ही बोला. बोलाच. बोलत रहा.

मनात येईल ते.

फक्त त्याने कोणाच्या भावना दुखवू नका. कोणाला न पटेल असे बोलू नका.

कोणाला अडचणीत पडायला होईल असे बोलू नका.

कोणाच्या शेपटावर पाय पडेल असे नका बोलू.

काय आहे कुणाचा भावना दुखवून नि अस्मितेस इजा करून कसे चालेल?

तेव्हा बोला.

बोलाच..

पण तेवढे सोडून बोला..

आमच्या श्रद्धास्थानांना धक्का नको.

इतिहासाची मोडतोड करा.. पण आम्हाला पटेल तशी करा म्हणजे आम्हाला त्यात काही वावगे वाटण्याचा प्रश्नच नाही.

आम्हाला पटेल तेच बोललात तर आम्ही काय तुम्हाला बोलण्यापासून रोखणार आहोत?

अहो बोला.

तो तुमचा हक्कच आहे.

बोला. व्यक्त व्हा.

मनाला वाटेल ते बोला..

मनात येईल ते बोला..

फक्त एकच करा..

वरीलपैकी सर्व नीट वाचून मनात योग्य तेच येऊ द्या.

मनातच योग्य ते येऊ द्या..

आणि

मनात योग्य ते येऊ द्याच.

म्हणजे तुम्हाला..

हवे तसे

हवे तितके

हवे तेव्हा

हवे तिथे

हवे तितका वेळ

बोलता येईल.

मग आम्ही त्यात आडकाठी आणणारे कोण? बोलणे तुमचा हक्क आहे.

मूलभूत हक्क.

त्यावर गदा आणणारे आम्ही कोण?

फक्त थोडी व्यवधाने सांभाळून बोला..

बोलाच तुम्ही.

आम्ही ऐकायला तयार आहोत.

संविधानाने दिलेले स्वातंत्र्य आहे ते.

ते जिवापाड जपा.

बोलण्याचा हक्क बजावत रहा.

बोला. बोलाच. बोलत रहा..

फक्त एकच..

तेवढे सोडून बोला..!

माझ्या कातडीची गोष्ट ..

तुम्हाला सांगतो..

खोटं नाही काही..

अगदी शहारा आला.. कातडी थरथरली.. नि घाम सुटला..

हसताय कशाला?

खरेच झालंय तसं.

नाही म्हणजे तुम्हाला आश्चर्य वाटत असणार. पण मला नाही.

तसा मी उगाच बदनाम.

कोणाला निर्लज्ज म्हणायचे.. घ्या माझे नाव.

निगरगट्ट म्हणायचेय.. आहेच मी दिमतीला..

अगदी एक शिंग माझे.. त्या शिंगाची शपथ!

लोक म्हणजे असे आहेत सांगतो..

कोणाला त्याच्या वैगुण्यावरून हिणवू नका म्हणतात..

नि गेंड्याची कातडी म्हणून कोणाला दूषणे काय देतात?

नाही म्हणजे निगरगट्टपणा नि निलाजरेपणा ही काय आम्हा गेंड्यांची खासियत नाही.

पण त्या विधात्याने आमची बाॅडी डिझाईनच अशी बनवलीय की सांगणार कोणाला?

नि या माणसाने आमच्या कातडीला घेतले उदाहरणादाखल!

आणि मग मधल्या मध्ये बदनाम कोण?

तर आम्ही!

एकशिंगी गेंडे..

कोणाच्या अध्यात मध्यात नसून सुद्धा!

पण सांगत होतो ती माझी हालत..

काय झाले ना..

आमच्या या प्राणी संग्रहालयात त्यादिवशी गडबड झाली.

म्हणजे गेले काही दिवस आमचे पिंजरे रंगवले गेले.. पाणीबिणी भरले गेले. साफसफाई झाली. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर अंदाज आलाच मला.. कोणीतरी महनीय व्यक्ती येणार. त्याशिवाय असे सगळे कामाला लागतात होय?

आणि माझा अंदाज चुकतो थोडीच!

लाल दिव्याच्या गाड्या आल्या.

पांढऱ्या शुभ्र कडक इस्त्रीच्या कपड्यात साहेब उतरले.

आजूबाजूला त्यांचा हुकूम झेलायला वाकून अधिकारी वर्ग.

साहेब एका कानावर काहीतरी नवीन घेऊन त्यात अखंड बोलत पिंजऱ्यांवर नजर टाकत झरझर चालत होते..

माझ्या पिंजऱ्यातून बघत होतो मी..

लोकांची लगबग सुरू होती.

साहेबांच्या भेटीमुळे असेल, आज लहान मुले कुठेच दिसत नव्हती ..

मग माझ्याच पिंजऱ्याबाहेर साहेब उभे राहिले.

त्यांच्या मागोमाग हातात कसली तरी नळकांडी घेऊन माणसं आली..

मग कसले कसले प्रश्न विचारू लागली..

पण साहेब काय.. कसलेले गडी..

म्हणे पाच वर्षांपूर्वी ह्या प्राणी संग्रहालयासाठी केलेल्या खर्चाचे काय झाले?

आणि काय तर या पुढे नवीन काय?

नवीन प्राण्यांच्यासाठी केलेल्या खर्चाचे काय झाले?

असे काही बाही विचारत होते.

साहेब मस्तपणे सगळे टोलवत होते..

लोकं त्या नळकांड्यासारख्या बोंडकात बोलायचे.. साहेब त्यावर टाळ्या घेणारी वाक्ये बोलायचे..

मला आठवले.. तीन चार वर्षांपूर्वी माझ्या सोबतीला गेंडा येणार म्हणून हेच साहेब सांगून गेलेले.

त्यानंतर असेच काहीबाही कानावर यायचे.

आजचा साहेबांचा आवेश तर अजून जबरदस्त ..

बोलण्यात साहेब हार कसले जातात..

पण ते बोंडूकवाले? ना ना प्रश्न विचारून भंडावून टाकले साहेबांना ..

साधासुधा कोणी असता तर घाम फुटला असता..

पण साहेब? हसतमुख अगदी!

खरं सांगतो..

साहेबांच्या त्या आवेशाने माझी ही गेंड्याची कातडी शहारली..

थरथरली ..

त्या जाड कातडीवर घामाच्या धारा वाहायला लागल्या ..

लागणारच!

जातीच्या गेंड्याला आपल्यासमोर आपल्याहून जाड कातडीचा कोणी दिसला तर?.

आणि एकच वाटले ..

.. अजून या गेंड्याच्या जातीला खूप काही शिकण्याचे बाकी आहे!

बोलकी बाहुली!

हो ना!

आहेच तुम्हाला स्वातंत्र्य.

काही ही करण्याचे नि लिहिण्याचे नि बोलण्याचे इत्यादी इत्यादी.

नाही म्हणजे तशी ना नाही आमची.

संविधानानेच तशी सोय करून दिलीय तुम्हाला.

बोला. बिनधास्त बोला.

अगदी उचला जीभ लगेच नि लावा टाळूला.

काय म्हणता?

टाळूला जीभ लावून फक्त काहीच अक्षरे बोलता येतील? भाषा तज्ञ त्याला तालव्य अक्षरे म्हणतात म्हणे!

मग काय बिघडले?

काहीच नसण्यापेक्षा काहीतरी असणे चांगलेच नाही का?

पण नाही.

तुम्हाला त्याची किंमत नाही कळणार. सदैव नुसत्या तक्रारी.

तर बोला.

बोलून घ्या. बोलत रहा.

कोणी ऐकतंय का नाही .. बोलण्याला अर्थ आहे की नाही .. याची चिंता न करता बोला..

सगळे आम्ही तयारच आहोत ऐकायला.

ऐकून घ्यायला ही.

आणि ऐकून न ऐकल्यासारखे करायला ही.

अहो बोलायला पैसे पडत नाहीत. ऐकायलाही नाहीत.

तेव्हा बोला.. बोलत रहा..

मनात येईल ते बोला.

मनाला येईल ते बोला..

कुणी म्हणेल विचार करून बोला..

बोलता येईल तसेही..

पण ती काही पूर्व अट वगैरे नाही!

तेव्हा बोला.. बोलत रहा!

काय म्हणता?

तुमचे कोणी ऐकत नाही?

अहो, आपले कर्म करा. फळाची अपेक्षा कशाला करताय?

आपल्या संस्कृतीची काही माहिती आहे की नाही तुम्हाला?

उचला ती जीभ.. लावा टाळूला..

शाबास..

असे त त प प करू नका..

अस्खलित बोला..

बोला.. बोलत रहा..

काय म्हणालात?

अगदी काहीही बोलू शकतो?

अर्थातच. काहीही ..

फक्त एकच..

टर्म्स अॅंड कंडिशन्स अप्लाय..

होय.. त्या मुंगीसारख्या अक्षरातल्या टर्म्स अॅंड कंडिशन्स .. त्या वाचा..

काय म्हणता?

वाचता येत नाही येत?

मग भिंग घेऊन वाचा.. बहिर्गोल.

नाहीतर तुम्हाला सारांश सांगू का?

ते हिंदी गाणेय ना..

जो तुमको हो पसंद वही बात कहेंगे..

तेच!

तोच सारांश.

तर जे त्यांना आवडेल ते बोला.

जे त्यांनाच आवडेल ते बोला..

जे त्यांना आवडेल तेच बोला..

जे त्यांना आवडेलच ते बोला..

आणि हुशार असाल तर..

जे त्यांना आवडेल ते बोलाच..

काय म्हणता?

त्यांना म्हणजे कोणाला?

छे!

इतके तुम्ही मठ्ठ असाल असे वाटले नव्हते.

उगाच नाही, ते 'ते' आहेत.. आणि तुम्ही .. 'तुम्ही' ..

नाहीतर एक करा ना..

बोलक्या बाहुल्यांचा कार्यक्रम पाहिला असेल तुम्ही ..

तसे बाहुले बना..

मग बघा.. बोलविता धनी मागोमाग येईलच..

मग तर काय..

नुसते ओठ हलवा.. हात हलवा ..

बोलण्याची सोय 'त्यांच्या'कडून होईलच ..

अगदी मोफत ..

तशी आॅफर अमर्यादित काळासाठी उपलब्ध!

अटी आणि शर्ती विचारताय?

अट एकच.. आजन्म आमरण बोलकी बाहुली बनून रहा..

बाकी काही मागणी नाही त्यांची बरे ..

नमुना!

काय कसली कसली माणसं असतात नाही?

आम्ही इतक्या वर्षात इतके नमुने पाहिले.

कितीक प्रकारचे.

हा असा तर तो तसा.

कुणी कमी असा तर कुणी जास्त तसा.

कुणी काळा.. गोऱ्यासारखा दिसणारा.

कुणी ओरिजिनल गोरा.. निरखून पाहिले की आतून काळा दिसणारा.

कुणी अंतर्बाह्य कृष्ण .. ते एक बरेय.. वरलिया रंगासी भुलणे नको!

कुणी उगाच राकट.. अगदीच कणखर पणाचे सोंग आणणारा..

पण आम्ही आमच्या पद्धतीने त्याच्याशी डील केले तर मऊ पडणारा .. ओल्या कापसासारखा. लिबलिबीत!

त्या उलट..

कुणी अगदी नम्र.. विनम्र.. नतमस्तक.

पाया पडणारा..

अगदी वाटेल की हा आवाक्यातील.. तर आपली छुपी नखे दाखवणारा..

कुणी गरीब गाय..

कुणी वारंवार आपल्या वळणावर येणारा वळू..

तर कुणी मारकी म्हैस!

कुणी वाघाच्या कातड्यातील कोल्हे

तर कुणी गायीच्या व़ेशातील लांडगे!

पण सरते शेवटी सगळे सारखेच..

आमच्या मार्गात हे आले तर आम्ही साम वापरतो..

त्यात निम्मे गारद..

आमच्या वाणीचा नि वाणिज्य बुद्धीचा परिणाम सगळा..

उरलेले दाम.. यातच आऊट.

काही स्वयंचीत..

पण दामापलिकडे कधी जावे लागत नाही.

आपल्या देवभक्तांस लक्ष्मी दर्शनाची ओढ फार.

आणि आमच्या कराग्रे वसते ती लक्ष्मी!

त्यामुळे बहुतेक सारी प्रकरणे दाम म्हटले की राम म्हणतात.

मी मी म्हणणारे दामाच्या वाढत्या दबावाखाली टिकत नाहीत.. फक्त एकेकाची किंमत वेगळी.

देवदयेने सारे काही आहे..

म्हणजे ही खुर्ची आहे..

त्यामुळे धनाचा अखंड प्रवाहो वाहिला अशी स्थिती आहे..

सढळहस्ते लक्ष्मी करकमलातून हस्तांतरित होते.

आमची अडचण मिटते..

मार्ग मोकळा होतो ..

कामे मार्गी लागतात ..

सारे कसे सुरळीत सुरू राहते..

थोडक्यात

आमच्या मार्गातले काटे नि कंटक सारेच.. लक्ष्मीकृपेने दूर होतात..

मग तो समोरील असा असो की तसा ..

पण हा?

हा म्हणजे एक दुर्मिळ नमुना.

माणसाला काही हवे असेल तर त्याला ते देता येते..

छोटी गोष्ट असेल तर तो ऋणी राहतो.

अगदीच मोठी गोष्ट असेल तर मिंधा बनवून ठेवता येते..

त्याचा स्वार्थ हीच आपली चलनी नाणी.

किंवा कधीही वटणारी हुंडी.

ती वटवावी नि वट्ट आपली कामे करून घ्यावीत..

तो थोडीफार वटवट करेल कदाचित.

पण आपली वट अशातूनच वाढवत न्यावी.. कार्यसम्राटपदासाठी अशी तयारी करत रहावे..

घेणाऱ्याची किंमत चुकवली की त्याच्या कडून कामे करवून घेताना आपल्याला ओशाळवाणे वाटत नाही ..

.. नि घेणारा दबावाखाली राहणे हा अजून एक फायदा!

पण समोरचा निस्वार्थी .. कसलीच इच्छा नसलेला असेल तर?

जो जे वांछील तो ते लाहो.. हे ठीक आहे..

पण..

ते वांछील काहीच नसेल तर?

ज्याची काही मागणीच नसेल तर त्याचे काय करावे?

ज्याला कसलाच स्वार्थ नाही..

ज्यास कसलेच भय नाही..

त्याचे काय करावे?

आहेत.. असे ही नमुने आहेत!

व्यक्ती तितक्या प्रकृती नि

व्यक्ती तितक्या प्रवृत्ती ..

हे खरंय.

पण ही दुर्मिळ जमात सर्वात धोकादायक..

प्रामाणिकता हा प्रमाण गुण मानणारी ..

कशास न बधणारी..

नंगेसे खुदा भी डरता है म्हणे..

तसे

या प्रामाणिकांची प्रत्यक्ष सम्राटास ही भीती वाटेल..

अशांची संख्या मर्यादित आहे तोवर ठीक..

पण जगातून स्वार्थच बाद झाला तर हे जग चालावे कसे?

त्या ईश्वरासही ते ठाऊक असणार ..

म्हणून तर त्याने ही जात तशी थोड्याच प्रमाणात नमुन्यादाखल बनवली असणार ..

नमुना!

खरेच ते!

नमुनाच एक.

देव करो..

आणि असला दुर्मिळ कुणी तुमच्या वाटेत न येवो..

आणि तुमच्या वाटेला न जावो..

अर्थात काळजी नसावी..

शेवटी हे नमुने ही आहेत नमुन्यादाखलच!

वाईच जादाच भाऊ ही लोकशाही ..

रामराम मंडळी.

कटाळून गेलो की राव.

ह्ये काय राज्य हाये की काय?

पाच वर्ष संपत आलीत म्हने. अगदी काल झाल्यासारखं वाटतंया .. पाच वर्ष झाली सुदीक?

आता समदे म्हनतायत..

.. चला कामाला लागा?

ह्ये बरंय राव!

आता तर कुठं सगळा खेळ जमत आलाया.

जमत आलाया म्हना नायतर जमवत आनलेला म्हना. असं आपसूक असं काय कधी कुठं व्हतंय होय?

सगळी टोकेटाकं जमवून आकृतीबंद बनवायाला लागतो..

आकृतीबंद म्हणजे काय?

काय पन विचारताय राव!

म्हंजे, आम्हाला काय तसं थोडं थोडं माहितीय. पण अर्थाचं काय घ्यून बसलायत?

सरकारात राहून असले शब्द वापरावे लागतात. भारदस्त. वजनदार..

आकृतीबंद!

काय म्हनता? धरबंद चा भाऊ?

इनोदीच ब्वा तुम्हीबी!

अहो, हा कावा त्या इरोधकांचा.. त्यांनाच धरबंद राहिला न्हाई ..

तर सांगतोय ना ते ह्येच. अगदी कटाळून गेलोय राव.

पाच वर्षापूर्वी आम्ही ह्या ह्या मतदारसंघात जणतेच्या कृपावर्षावात न्हाऊण निघालो. जणताच ती. प्रेम करनारच. आमच्यासारख्यांवर नायतर कोनावर करनार?

मंग? आता काय?

पाच वर्षानी ते प्रेम आटतंय व्हय?

परत तपासून पहा म्हणे!

पन आमची जणता अशी इसरभोळी न्हाई. आम्हाला अन आमच्या कामाला इसरत न्हाई.

कोन म्हनतो काय विचारताय?

कोनी म्हनायला कशाला हवेय?

हातच्या कांकनाला आरसा कशाला?

आमची जणता काय आमचे उपकार विसरतेय होय?

आणि आम्ही बरे इसरू देऊ?

पाच वर्षात आम्ही काय नाय केले? जागोजागी लागलेले नुसते आमचे बोरड वाचलेना तरी ही कळून येईल.

पन न्हाई. हे प्रश्न इचारनार म्हने!

आन इरोधक काय.. टपूनच बसलेले.

बगळ्यावानी.

चोचीत मासा गावला की गिळलाच समजा.

म्हंजे बघा..

जणतेच्या प्रेमाखातर नि प्रेमामुळे आम्ही निवडून आलो..

आता गपगुमान कारभार करू द्यावा की न्हाई?

पन न्हाई.

बोरूबहाद्दर प्रश्न विचारनार.

इरोधक रान उठवनार..

आरं.. पाच वर्षापूर्वी सोडवलेला परीक्षेचा पेपर .. आता परत नवा पेपर सोडवायला लागनार..

तुम्हाला सांगतो..

त्या सुशिक्षितांचे एक बरं असतंय. एकदा डिग्री लागली शेपटीसारखी नावापुढं तर आयुष्यभर पुरते.

नायतर आम्ही.

दर पाच वर्षांनी नवी परीक्षा. नवा पेपर. नवी डिग्री.

कठीण होऊन बसलंय राव.

जणसेवेची तळमळ आम्हाला स्वस्थ बसवत न्हाई. पन एक नम्रपना म्हनून काही असतो की न्हाई?

परत परत जणतेला आपले काम ऐकवायचे. स्वतःची स्तुती करत राहावे ..

म्हटले ना जीव कटाळून कटाळून गेलाय नुसता..

आधी निवडून या.

कामाचा भला थोरला डोंगर उबा करा. आन

सर्वांना तो दाखवत फिरा.

ते पेपरवाले नि बोंडूक घेऊन फिरणारे चॅनेलवाले नि अट्टल विरोधी .. त्यात खुसपटं काढनार..

मग ती झेंगटं निस्तरा..

इतक्यात सगळे म्हननार.. घंटा झाली. पाच वर्षाचा पेपर लिहून संपला.. आता नवीण पेपर लिहायला घ्या.

सारे प्रश्न .. प्रश्न ..

जिवाला शांतता म्हणून न्हाई.

कोनीबी उठतो नि प्रश्न विचारतो..

कोनीबी उठतो नि प्रश्न निर्माण करतो..

कटाळून गेलाय जीव..

तुम्हाला सांगतो राव.. अवघड झालंय त्रागंडं.. जणसेवेची आस आम्हाला स्वस्थ बसू देत नाही .. पन हे बरोबर न्हाई ..

तुम्हाला सांगतो आम्हाला अंदाज आलाया ..

फारच बोकाळलीया आपल्याकडं .. ही लोकशाही.

जरा जास्तच झालीय भाऊ .. ही लोकशाही ..

आम्हाला तर पटलंय हे..

म्हंजे थोडीफार ठीक आहे..

पन हे आम्हाला उत्तरे द्यायला लावने वगैरे .. जरा जास्तच होतंय राव..

वाईच जादाच होतेय ही भाऊ..

- लोकशाही..

कळसूत्री

आपलं बुवा असं आहे.

उठ म्हटले की उठा

बस म्हटले की बसा..

झोप म्हटले की झोपा..

त्यांनी सांगितले की..

ते म्हणतील तसे करा..

ते म्हणाले मतदान करा..

त्यांनाच करा ..

तर आम्ही दान करतो.. आमचे मत ही दान करतो.

ते म्हणतात हे योग्य

आम्ही पण तेच म्हणतो ..

त्यांना एखादी गोष्ट अयोग्य वाटली

तर अर्थातच ती तशीच असते.

ते सर्वज्ञ.. सर्वज्ञानी..

ते महान .. महाज्ञानी..

महाभाग ..

ते त्राते.. सर्वज्ञाते..

भाग्यविधाते..

ते तारणहार..

म्हणून आम्ही त्यांच्या गळ्यात घालतो हार..

होऊ देणार नाही त्यांची हार..

ते म्हणतात देश हा देव असे माझा..

आहे. पण आमच्यासाठी मात्र तेच देव..

ईश्वरांश..

त्यांना आम्ही केलेला नमस्कार म्हणून डायरेक्ट देवापर्यंत पोहोचतो.

त्यांचे सारेच योग्य.

काय सांगावा त्यांचा प्रताप

काय आठवावे त्यांचे रूप..

आम्ही परम नशीबवान

भाग्यवान..

आमच्या आयुष्याची दोर त्यांच्या हाती आहे.

विचार करा..

ते आम्हाला आपल्या स्वहस्ते खेळवत आहेत.

प्रत्यक्ष गाॅडस् ओन हँड ..

हिज मास्टर्स व्हाॅईस सारखा अवर मास्टर्स हँड..

आम्हाला हलवतो..

खेळवतो..

आमचे हलतात ओठ..

आम्ही बोलताना दिसतो..

पण प्रत्यक्ष ते आमच्याकडून सारे करवून घेतात..

आमचा आवाज म्हणजे अवर मास्टर्स व्हाॅईस!

कर्ता करविता जगन्नियंता परमेश्वर त्या तिथे आकाशस्थ..

आणि या इथे देशस्थ .. तेच.

आमच्या कळसूत्रीचे दोर हातात घेऊन.

आम्ही भाग्यवंत..

आमच्या कळसूत्राची सूत्रे त्यांच्या हाती आहेत.

आम्ही कठपुतली सारखे ..

हलतो पण हलत नाही.

बोलतो पण बोलत नाही ..

नाचतो पण नाचत नाही..

स्वतःहून!

ते म्हणतील नि ते करतील तसे!

आणि तसेच!

काय म्हणालात?

आम्ही हे स्वतः सांगतोय का?

यू मीन आम्ही स्वत:च हे सांगतोय का?

आता आम्ही आहोत कळसूत्री.. कठपुतली..

इतके आम्हास ठाऊक..

आम्ही सांगितल्याने तुम्हास ठाऊक..

त्या पलीकडे ..

छे!

तुम्ही सुज्ञ आहातच..

नाही म्हणजे तसा आमचा समज..

कदाचित गैरसमज.. आहे..

रंग बदलती..

कुणी मला सृष्टीचा चमत्कार म्हणतात..

.. निसर्गदत्त देणगी आहे म्हणतात.

नाही, तसे अगदीच खोटे नाही ते. म्हणजे थोडेफार खरेय ते.

खरेतर थोडेफारच खरेय ते..

अगदी ऐकीव भाषेत बोलू तर त्यात सत्याचा थोडा अंश आहे..

.. थोडाच अंश आहे

.. आणि सत्तेचा जास्त!

आणि तसा मी काही अपवाद नाही..

आमच्या प्रजातीत हे होतच असते म्हणे!

पण सबंध जाती प्रजातीबद्दल कशाला बोला?

कारण अर्थातच.. मी तसा स्पेशल सरडा आहे!

साधासुधा नव्हे!

लोकांच्या पण आम आदमी आणि खास आदमी अशा जाती असतात असे ऐकून आहे मी.

अहो, खरंच आहे ते!

तसा मी ही.

आम सरडा नव्हे .. तर खास सरडा!

समर्थाघरचे सरडे आम्ही!

समर्थाघरच्या सर्वांस मान मिळत असतोच..

म्हणजे श्वानच नव्हे तर समर्थाघरच्या सरड्यासही सर्व देती मान!

तर, काय आहे,

अगदी कुंपणापर्यंत धाव घ्यायची झाली तरीही काय झाले?

म्हणजे जीव वाचवायचा तर तसे करायला हवेच!

आजूबाजूस बघायचे ..

इकडेतिकडे नजर टाकायची,

रागरंग बघायचा ..

कुंपणावर बसायचे..

कधी या तर कधी त्या बाजूस जायचे..

एका समर्थाकडून दुसऱ्या अति समर्थाकडे..

नि मग परिस्थिती पाहायची ..

नि रंग बदलायचा!

असा नि इतका की कोणाला ओळखू येऊ नये.. कोणास ओळख पटू नये!

तोही क्षणार्धात!

कारण काय?

काय विचारता?

सांगितले ना, जीव वाचवणे ही प्राणिमात्राची आदिम प्रेरणा आहे म्हणतात.

जान है तो ही जहान है म्हणे!

खरंच आहे ते!

परिस्थितीनुरूप बदल नाही केला तर लय अटळ आहे!

टिकून रहायचे तर जुळवून घ्यायला हवे.. घ्यायलाच हवे!

अगदी या कुंपणापासून त्या कुंपणापर्यंत धाव घ्यायची म्हणावे तरी..

अखंड असावे सावधान!

समर्थाघरी शिकलेले वचन आहे ते!

चाणाक्ष नजर चौफेर, आणि बदलत्या परिस्थितीत कोणास लक्षात येण्याच्या आत अति चापल्याने स्वतःस बदलणे!

या नि त्या बंगल्यात राहणाऱ्या समर्थांकडून शिकलेली कला आहे ती.

तिकडचे साहेब तर कुंपणावर बसतात बहुतेक वेळा.. रागरंग पाहून रंग बदलतात .. आणि स्वतःची टोपी देखील बदलतात.

इकडचे साहेब .. ते देखील तसेच!

अहो, अगदी काहीच दिवसांपूर्वी इकडचे साहेब तिकडे नि तिकडचे इकडे होते..

मग त्यांनी टोप्या बदलल्या ..

मी स्वतः पाहिले आहे.

पण आम्हा सरड्यांच्या जातीत कुठे आल्यात टोप्या न बिप्या..

आम्ही पाहून पाहून शिकलोय..

कुंपणापर्यंत धाव घेणे

नि

झरझर रंग बदलणे!

आता सृष्टीचा चमत्कार म्हणतात कोणी तर मला वैषम्य वाटते..

सरड्याच्या जातीला तितके तर यायलाच हवे!

मग वैषम्य का वाटते सांगू?

अहो, निसर्गाने ही रंग बदलायची सोय दिलीय.. ती आम्हा सरड्याना देवदत्त आहेच, पण..

पण या बंगल्यातील साहेब नि त्या बंगल्यातील साहेब..

दोघेही माझ्याहून झरझर रंग बदलतात ..!

तसा त्यांच्याकडून मी शिकलोय खूप सारे..

पण गुरूची सर शिष्यास कशी यावी?

आणि जातीच्या सरड्यास असे मनुष्यमात्राकडून शिकायला लागावे?

अर्थात तसं जास्त वाईट वाटून घेत नाही मी.

कुठलीही गोष्ट जास्त मनाला लावून घेणे पटत नाही मला..

.. तसेच शिकलोय साहेबांकडूनच!

होकायंत्री

का इतका खुश दिसतोय मी?

अहो, खुश तर होणारच मी.

नावातच माझ्या सदा आनंद आहे!

मी सदानंद सदावर्ते.

तर साहेब खुश तर मी खुश!

साधी गोष्ट आहे!

साहेब माझे तसे मोठे आहेत. म्हणजे मोठेच आहेत.

नाही म्हणजे त्यांच्या कचेरीबाहेरील रांगा पाहून अंदाज आलाच असणार तुम्हाला.

लोकं कामं घेऊन येतात. काहीबाही काम असते.

साहेबांची वटच तशी.

आणि कामाची धडक पद्धत. बेधडक कामं करतात साहेब. त्यात त्यांना कोणी अडवू शकत नाही.

कोणी म्हणजे मी देखील!

कसं आहे ना.. साहेबांचा सचिव मी. स्वीय सचिव.

साहेब या कचेरीत आले. तेव्हा मला घेऊन आले म्हणायचे.

म्हणजे अगदी दुसऱ्या विभागातून मला इकडे मागवून घेतले.

तुम्हाला वाटेल साहेबांची नि माझी ओळख असेल आधीपासून. पण नाही!

साहेबांनी माझ्यातला कोणता गुण हेरला कोणास ठाऊक.. पण त्यांच्या गुणग्राहकतेमुळेच आज मी येथे आहे हे खरे!

आता सचिवाचे गुण म्हणजे काय?

कामाचा उरक.

साहेबांच्या बेधडक कामात धडक दाखवीत फायलींचा फडशा.

सगळ्या नियमांची अगदी अंतर्बाह्य माहिती.

साहेब तेच म्हणतात..

नियम बनतात त्यांची परिपूर्ण माहिती हवीच. म्हणजे कोणत्याही कामाला नियमात बसवावे कसे हे माहिती करून घेणे महत्त्वाचे.

त्याचे काय आहे ना.. कायदे कानून बनतात तेव्हा त्यात पळवाटा अंतर्भूत करणे हे काम कायदे बनवणाऱ्यांचे. त्यासाठी अत्यंत कुशाग्र बुद्धीचे लोक तिथे घेतले जातात. कायद्याच्या अभ्यासात कायदेशीर काय यापेक्षाही बेकायदेशीर बाब कायद्यात कशी बसवावी हाच अभ्यास महत्त्वाचा.

आणि त्या पळवाटांची इत्यंभूत माहिती हा सचिवाचा खास गुण!

साहेब त्यामुळे माझ्यावर खुश.

आणि साहेब खुश तर मी पण खुश!

आणि हो..

हा 'हो' साहेब दरबारात सर्वात महत्त्वाचा!

म्हणजे साहेबांना 'नाही' हा शब्दच आवडत नाही..

सॉरी,

म्हणजे सांगताना हेच नकारार्थी वाक्य

'साहेबांना नकारार्थी वाक्यांची नावड आहे' असे लिहावे किंवा बोलावे लागेल!

तर साहेबांना असे होकारार्थी लोकच आवडतात. किंवा होकारार्थीच लोक आवडतात.

एकदा साहेब म्हणाले ही तसे मला..

सदानंद, तुम्ही हो ला हो म्हणता ही कीर्ती ऐकूनच

तुमची बदली करवून घेतली नि नेमणूक झाली तुमची इथे.

असणार. असेच असणार.

मी करियरच्या सुरूवातीलाच हे पक्के ठरवून घेतलेले..

ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी!

नव्हे, त्याचीच वाजवावी टाळी!

खरेतर, त्याची वाजवावीच टाळी हे ही खरे!

त्यामुळे हा होकारार्थी स्वभाव आजवर मला इथवर घेऊन आलाय!

काय म्हणता?

इथून बदली झाली तर?

तुमचे लक्ष दिसत नाही माझ्या सांगण्याकडे.

आताच म्हटले ना, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी..

आणि त्याचीच वाजवावी टाळी!

तेव्हा मी तिथेही असाच असेन..

होकारार्थी ..

होकायंत्रासारखा.

त्या त्या साहेबाची उत्तर दिशा ओळखून त्याप्रमाणे आपली होकायंत्री सुई वळवणारा!

माझ्या यशाचे हे गमक..

आणि यश म्हटले की खुशी आलीच..

म्हणून मी हा असा.. नुसता नावानेच सदानंद नाही,

तर खराखुरा.. सदा आनंदी..

देशद्रोही ..

तुम्हाला ठाऊक नाही?

तुम्हाला खरेच ठाऊक नाही?

- की ठाऊक असूनही असे.. की ठाऊक करूनच घ्यायचे नाहीए?

अहो, असेच आहे हे.

अगदी आजच्या मोबाईलपर्यंत सारे काही होते तेव्हा. तेव्हा म्हणजे प्राचीन काळी. टीव्ही नि रेडिओ तर असणारच. नाहीतर संजयाने महाभारताचे थेट प्रक्षेपण केले असते का?

मला तर वाटतेय अगदी हा मोबाईल .. अगदी स्मार्ट फोनपण तेव्हा होता. नावबिव वेगळे असेल पण तंत्र तेच नि ज्ञानही तेच. फार प्रगत होते हो आमचे पूर्वज.

पण आपले दळभद्री राजकारणी. नतद्रष्टांनी सारे दडवून ठेवलं. कशासाठी काय विचारताय? क्षुद्र राजकारण हो! पूर्वज आपले महान होते यात शंका नाही. पण लक्षात कोण घेतो? मुळात आपल्याला त्यांचा अभिमान हवा. त्यांचे कर्तृत्व पाहिले की वाटेलच तो. काय म्हणता?

त्यासाठी पुराणे ग्रंथ वगैरेंचा अभ्यास करायला हवा? नाही म्हणजे शून्याचा शोध वगैरे नि आर्यभट्टाचे काय काय खगोलशास्त्रीय संशोधन वगैरे याबद्दल ठाऊक आहे हो. पण बाकीचे?

त्याबद्दल वाचायचे म्हणजे जुन्या पोथ्यापुराणे वाचत बसायची. बसायला हरकत नाही हो. पण त्यातून शेवटी मिळणार हेच की नाही .. की आपले पूर्वज ग्रेट होते? नवीन ते काय मिळणार? उगाच वेळेचा अपव्यय. त्यापेक्षा तोच वेळ या लोकांची थोरवी सर्वांना ऐकवण्यात घालवणे श्रेयस्कर. आणि त्या अभ्यासातून दिसणार काय? मी म्हणतो हे आताचे नवनवीन शोध त्यावेळेस असणारच. शंकाच नको.

अहो, उगाच शंकाकुशंका घेऊन आपल्या प्राचीन संस्कृतीचा अपमान नको. अहो पुराव्याने शाबित करायला ही गोष्ट म्हणजे काय कुठला गुन्हाबिन्हा आहे? उगाच आपले काहीतरी खुसपट काढत बसता नि काय?

थांबा थांबा.. एक सेकंद .. शंका घेताय? प्रश्न विचारताय?

शंकासुर कुठले!

साधेसुधे नाही .. तर मला तर तुम्ही ते देशाबद्दल अभिमान नसणाऱ्यांपैकी वाटताय.

नाही म्हणजे आजकाल तण माजावे तशी ही जमात फैलावतेय.. त्यापैकीच कुणी आहात तुम्ही. नाहीतर आपल्या प्राचीन संस्कृतीविषयी असले प्रश्न विचारायला जीभ धजावलीच नसती..

- अहो, काही गोष्टींबद्दल मनात किंतु येऊ देणे हे देखील पाप. आज हे असे, मग उद्या तुम्ही देवाच्याच अस्तित्वाबद्दल प्रश्न विचारायला कमी करणार नाही. खरेतर तुमच्या सारखे पाखंडी लोक म्हणजे धर्मद्रोही, संस्कृतीद्रोही

- आणि खरेतर देशद्रोही सुद्धा.

- खरे सांगतो..

मला तर वाटते अशा शंका मनात येऊ देणाऱ्यांविरूद्ध कडक कायदाच करून टाकला पाहिजे. तडीपार करून टाकायला हवेत सारे.. पुरावा मागताय.. अरे, हातच्या कांकणाला आरसा कशाला?

काय म्हणता? हे काय अजून नवीन?

म्हणे पूर्वजांच्या वारशावर किती काळ तग धरणार? आणि आताचे काय?

आताचे काय? काय म्हणून विचारता?

अहो तुमच्या सारखे जोवर आहेत ना तोवर काही खरे नाही. तुमच्यासारख्यांमुळेच आज मागे पडलाय देश. जरातरी पुराणसंस्कृतीचा अभिमान बाळगा.. नि मग बघा. कसे झपाझप सारे बदलते चित्र ते. पुराण कालीन सोन्याचा धूर निघणारा प्रदेश आपला. सर्व बाजूंनी प्रगत नि जगास मार्ग दाखवणारा .. त्याची अशी अवहेलना?

- नाही म्हणजे तसा माझा अभ्यास नाही सर्व गोष्टींचा,

- पण.. पण इथे चिकित्सा नको.. शंकाकुशंका नकोत..

आणि अभ्यास? खरेतर अभ्यासाची गरजच नाही..

पण तुम्हाला का सांगतोय सारे?

- मला वाटते की खरेतर तुमच्याशी बोलणेच नको..

छे! अशा द्रोही व्यक्तींची सावली देखील नको..

- खरंच.. नकोच ते..

उत्क्रांतीकडे..

काय म्हणता?

म्हणजे तुम्हाला माहितीच नाही की काय? कशाबद्दल काय?

उत्क्रांतीबद्दल.

नाही माहिती?

अहो, हे फेसबुकावर वाचलेय मी. अगदी फेसबुकावर नसेल जायला तर व्हाॅट्सअॅपवर देखील वाचलेय.

मी काय म्हणते,

उगीच का कुणी असे मेसेज पाठवतो नि उगीच लिहितो. त्यात लिहिलेय म्हणजे नक्कीच तसेच असणार. ज्ञानाचा केवढा मोठा स्त्रोत उघडा झालाय सांगते.

- नाहीतर आधी..

..काय ना, ढुढ्ढाचार्य लोकं लायब्ररीत वगैरे जायचे काय. तासनतास बसून पुस्तके ढुंढाळत ज्ञानाचे कण गोळा करायचे काय..

आणि आता बघा.. आता हे ज्ञान सगळीकडे कसे मुक्तपणे वाट सापडेल तिकडे सगळे बांध तोडून वाहतेय. त्याला ना विषयाचे बंधन ना आशयाचे. काय म्हणता?

खरेखोट्याचे बंधन ही नाही?

असे कोण म्हणतेय?

अहो म्हणायला कशाला हवेय?

असेच आहे ते. ते खरेखोटेपणाबद्दल त्या ज्ञानाच्या मक्तेदारांनी उठवललेली आवई आहे नुसती. आपला मक्ता सोडायला कोणाला आवडते सांगा? जाड जाड ढापणं लावून नि जाडजूड पुस्तकं घेऊन स्वतःला विद्वान वाचस्पती म्हणवून घेणाऱ्यांना आता गल्लीबोळातील पोरंसोरांचे भय वाटणार नाही तर काय?

- आणि विषय कुठला ते विचारू नका. म्हणजे इतिहास भूगोलापासून ते भौतिक नि रसायनशास्त्राचे गणित जमवतात. आरोग्यशास्त्रात तर या फेसबुकी वैद्यांचा हात धरणारे कोणी नाही. कशाला हवेत कोणी तज्ञ नि बिज्ञ? तुम्हाला सांगते अशी ज्ञानगंगा वाहतेय सगळीकडे. आपला धंदा मंदा होईल म्हणून धाबे दणाणले सगळ्यांचे.

दणाणणार नाही तर काय?

एक दिवस हे व्हायचेच होते तुम्हाला सांगते.

- अहो चौफेर वाहणाऱ्या ज्ञानगंगेला कुणी अडवू शकणार आहे का?

आता मी तर म्हणते शाळा का ॅलेजातही इतके ज्ञान वाटप होत नसेल. ज्ञानाच्या गंगेत सामान्यातील सामान्यही हात धुवून घेऊ शकतो. याहून मोठी क्रांती कुणी पाहिली असेल?

- तर सांगत काय होते,

ह्या नवीन गोष्टींनी क्रांती घडवलीय.. आता उत्कांती दूर नाही म्हणे.

उत्क्रांती हो. माहिती नाही?

कालच वाचलेय मी. तशी कल्पना जुनाट आहे. नि तीही पाश्चात्त्य. म्हणजे आपल्याकडे त्याआधीच ऋषीमुनी सांगून गेलेच असणार, पण इतिहासात त्यांची नोंद कोण घेतोय? तर ते एक जाऊ देत.

- पण उत्क्रांती हळूहळू होते म्हणतात. पण ह्या ज्ञानगंगेच्या प्रवाहात ही उत्क्रांती लवकरच होईल म्हणतात.

कोण म्हणतो काय विचारता?

मी फेसबुकावरती वाचलेय हल्लीच. तेच तर सांगतेय. या फास्ट युगात सारे काही फास्ट. दिवस फक्त चोवीस तासांचाय अजून नि पोर पोटात मोठं व्हायला नऊ महिनेच लागतात अजून.

- तेवढे सोडले ना तर बाकी सगळे फास्ट.. जलदगती. त्यामुळे शतकानुशतकात होणारी उत्कांती आता चुटकीसरशी होईल म्हणतात.

मी तर म्हणते, होऊनच जाऊ दे. आपल्याला आपल्या डोळ्यांसमोर उत्क्रांती होताना दिसेल म्हणतात. मी तर आतुरतेने वाटच पाहातेय.

- तर सांगत काय होते..

- ती ज्ञानगंगा. दुथडीभरून वाहतेय. मोबायला मोबायलातून घरोघरी पाणी भरतेय.. तुम्ही वाचताय ना? वाचाल तर वाचाल! नाही म्हणजे अपडेट करत रहावे. आपण शाळा सोडली असेल लवकर .. पण आता हे ज्ञानार्जन करूयाच.. घेता किती घेशील दो करांनी असे होऊन जाते कित्येकदा..

- घरोघरी वाहणारी ही गंगा.. प्रवाहपतितासारखे प्रवाहात वाहात जावे .. ज्ञानतुषार अंगावर झेलावेत.. ऐकताय ना?

- चला तर मग, त्यात आपणही धुवून घेऊ.. आपले हात!

होय.. उत्क्रांती येत आहे .. लवकरच!

कारण..

आमचे हे असेच!

कारण सर्व गोष्टींस कार्यकारणभाव असतो असे आम्हाला वाटते. अहो, पृथ्वी फिरायला नि दिवस उगवायला पण काही कारण असते. गुरूत्वाकर्षण की काहीतरी म्हणे. असेलही. पण कसले ना कसले ते आकर्षण नि त्यातून सगळ्या घडामोडी..

काय म्हणालात? भानगडी?

तसं बरोबर आहे तुमचे.. पण..

पण कितीही योग्य असले तरीही भानगडी वगैरे काय अशी मोठयाने बोलण्याची गोष्ट आहे?

अर्थात राजकारणात आहोत आम्ही तेव्हा तुम्ही आपले असे म्हणावयास मोकळे ..

.. भानगडी म्हणे!

.. तर सांगण्याचे कारण..

कार्यकारणभावानुसार घडते सारे..

कारण..

कारण आम्हाला ठाऊक आहे सगळे काही कार्यकारणानुसारच चालणार.. कार्य आणि त्यास कारणीभूत होणारे कारण..

म्हणजे हेच बघाना..

आम्ही हे असे कसे झालो?

असे कसे म्हणजे?

अहो, असे कसे काय विचारता?

आम्ही असे राजकारणी कसे झालो?

म्हणालो ना, तोच कार्यकारणभाव ..

नाही, आमच्या राजकीय वैचारिक विरोधकांना त्यातही काहीतरी काळेबेरे दिसेल कदाचित .. पण म्हणजे फक्त सत्ता मिळवण्यासाठी ..

.. खुर्ची मिळवण्यासाठी

.. लाल दिव्याची गाडी मिळवण्यासाठी

.. इत्यादी इत्यादी.

.. पण त्यात त्यांची चूकच ती कोणती?

कारण..

सरड्याची धाव कुंपणापर्यंत.. नाही, कुंपणापर्यंतच!

त्यांना इतकेच दिसणार ..

खुर्ची दिसेल पण टेबल नाही ..

लाल दिव्याची गाडी दिसेल पण त्यासाठी करावे लागणारे दिव्य नाही ..

सत्ता दिसेल .. पण काटेरी मुकुट नाही ..

कारण.. तेच!

सरड्याची धावच तितकी!

तर सांगत आमच्या राजकारणात येण्याच्या कार्यकारणभावाबद्दल होतो.

त्याला कारण आमचे पिताजी.

कोणी म्हणेल घराणेशाही.. म्हणू देत!

पण सत्य तेच सांगतो..

आम्ही राजकारणात येण्यास पिताजींचा विरोध होता. म्हणायचे, समाजासाठी आम्ही केले तितके बलिदान बस्स.. सत्ताकारण नको.. समाजकारण करा.. फक्त समाजकारण.

पिताजींचा शब्द तो. म्हणायचे, राजकारण म्हणजे एक रण आहे. सदा सर्वकाळ युद्ध. तेही कोणाशी? सर्वांशी!

आणि ते कसे? तर कोणास जाणवू न देता!

म्हणजे कोणास कळू न देता अगदी सख्ख्या मित्राशीही युद्ध!

पण आम्ही पिताजींचे न ऐकता राजकारणात का आलो?

कारण आहे त्यास ..

म्हटले ना कारणाशिवाय कुठलीच गोष्ट होत नाही. कार्यकारणभाव असतोच..

तर बाबा वाक्यं प्रमाणं म्हणत आम्ही समाजकारणात उतरलो. मग कितीतरी सामाजिक कार्ये केली.. गणेशोत्सव काय.. दहीहंडी काय.. आम्ही आमच्या गावचे अनभिषिक्त नंबर वन कार्यसम्राट बनलो..

लोक अडीनडीला यायचे.. दादा हे काम करून द्या.. भाऊ ह्या कामाला मदत करा.. एक ना दोन!

मग आम्हाला जाणवू लागले..

.. हाती नाही सत्ता.. नुसतीच मत्ता.. तिचे करावे काय?

.. किती दिवस अन किती वेळा हाती फलक घेऊन मोर्चे काढावेत?

.. किती वेळ जनहितार्थ सत्ताविहीरीच्या बाहेर राहून नुसते इतरांना पाणी शेंदताना पाहावे?

.. किती वेळ पाण्यात राहूनही स्वतः कोरडे पाषाण रहावे?

.. कितीक वेळा कोणाच्या तोंडावर काळे फासण्याच्या धमक्या द्याव्यात?

त्यात मग आमच्या पिताजींचे निधन झाले. त्यांचे ते स्वप्न ..

एक पुत्रधर्म म्हणून ते साकार करणे.. ओघाने आलेच..

तर..

समाजकारणातून राजकारणात उतरणे आलेच..

समाजकारण.. राजकारण ..सत्ताकारण.. एकेक पायऱ्या आम्ही वरवरच चढणार..

.. विनाकारण त्यात शंका कुशंका कशाला?

आणि त्यात आश्चर्य कसले?

कारण तिघांमध्ये कारण हा शब्द सामायिक आहेच..

म्हणजे हाच तो कार्य'कारण'भाव ..

.. कारण

.. सांगितले ना आधी..

- कार्यकारणभावावाचून कोणतीच गोष्ट घडत नाही ..

कोणी खुर्ची देता का खुर्ची..

कोणी खुर्ची देता का खुर्ची..

ह्या गरीब बिचाऱ्याला कोणी खुर्ची देता का?

कालपर्यंत बुडाखाली होती तोवर तिचा कोण आधार होता. तिच्या चार पायांवर सारे जग तोलून धरायची ती.

तिच्यावर बसलेला मी.. सगळे नतमस्तक व्हायचे. तिच्यावर आरूढ झालेला मी नि माझ्या भेटीसाठी ताटकळत असलेले कित्येक. कित्येक म्हणजे .. सामान्यातिसामान्य कस्पटासमान आम आदमी पासून ते आमच्या बिरादरीतील शक्तिशाली नि युक्तिशाली सत्ताधारी म्हणा किंवा विरोधी म्हणा.. नगरसेवकांपासून आमदार.. खासदार.. असे कित्येक नामदार. माझे उघडण्याची वाट पाहात ताटकळलेले..

मी खुर्चीत.

करंजीत पुरण भरावे तसा बसलेला.

होय! करंजीतल्या पुरणासारखा! चुकीची नाही उपमा.. पुरणाशिवाय करंजीला करंजीत्व नाही .. नि बाहेरील करंजीच्या आवरणाशिवाय पुरणाला पूर्णत्व नाही! खरे की नाही?

तर ..

..खुर्चीतील मी..

शक्तिमान नि लेखणीच्या एका फटकाऱ्यात दुनिया बदलण्याची ताकद असलेला.

त्या दहा वर्षात बदलली मी दुनिया. काही नव्हत्याचे होते केले.. कित्येक होत्याचे नव्हते. एकदा जनसेवेची वाट धरली की जनहित, पक्षहित नि स्वहित.. सारे कसे अवघा रंग एकचि झाला म्हणावे तसे एकरूप होऊन गेलेले.

त्या दहा वर्षात दुनिया पाहिली, बदलली.

माझ्या पेनातील शाईस नि त्या शाईने केलेल्या सहीस इतके मोल आलेले. त्या सहीपुढे झुकलेली दुनिया.. आणि या सर्वांसाठी कारण म्हणजे ती.. माझी लाडकी खुर्ची..

आज तीच नाही ..

नि मी इकडे असा पंगू.

सारे आहे.. सारे काही आहे.. पण काहीच नाही असे का वाटतेय?

डोक्यावर टोपी आहे.. डोक्यात विचार आहेत. मनात जनसेवेची आच आहे.. हृदयात खोलवर रूतून बसलेली राबवलेली सत्ता आहे.. डोळ्यांसमोर ती जनसामान्यांची गर्दी आहे.. कानात खुर्चीवर असताना वर्षाव झालेल्या स्तुतिसुमनांचे शब्द आहेत.. जनकल्याणाच्या इच्छेने सदा आशीर्वाद द्यावा तसा उचलेला हात आहे.. हातात तेच पेन आहे.. तीच लेखणी आहे.. थोडक्यात..

सारे काही आहे इथे..

पण काहीच नसावे असे का वाटावे?

असूनही नसावे सारे?

कारण हीच खुर्ची..

त्या आमदार जगदाळेच्या क्लृप्त्यांना भुलून या बुडाखालून त्या बुडाखाली गेलेली ती.. माझी खुर्ची..

ती गेली नि मी असा झालो..

पंगू. हताश. हातातील शस्त्रे खाली टाकायला भाग पडलेला वीर..

नाहीतर मी आहे एक घोंघावणारे वादळ. जनसेवेच्या ईर्ष्येने तुफान वाहणारे वादळ.

आज हे वादळ शांत झालंय. थंडावलंय..

एक वावटळ आली नि वादळाला थंड करून गेली.

हजारो लाखोंचा पोशिंदा असा थंड झालाय..

या तुफानाला हवीय.. बसायला ती खुर्ची..

जिच्यावर बसून हे तुफान परत त्या वावटळीला तिची जागा दाखवून देईल..

परत सारी दुनिया या खुर्चीतून खाली सोडलेल्या माझ्या पायाशी लोळण घेत येईल..

जिच्यावर बसून हे तुफान लेखणीच्या एका झटक्यात घडवेल किंवा बिघडवेल.. हजारो लाखोंची भविष्ये नि भवितव्ये..

तळमळतोय जीव हिच्यावाचून..

घुटमळतोय हिच्या चारी पायांपाशी ..

ह्या तुफानाला हवीय ती ..

खुर्ची.

कोणी खुर्ची देता का खुर्ची..

घरानेशाही..

रामराम मंडळी.

मी बबनराव बजाबाराव मोहिते पाटील.

ओळखलं असेलच.

नाही म्हंजे बजाबा पाटलांची धाकली पाती. बजाबा म्हनलं की झटकन ओळख पटलीच पायजे. होय की नाही?

काय म्हनता?

मला कधी पाह्यलं नाही?

बरोबर आहे कसं पाहनार?

अहो राव, आता तर कुठं अठराचा झालो.

नाही म्हंजे तसे आमच्या गावात तसे शुभेच्छाचे बोर्ड जागोजाग लागलेले तेव्हा कळळं असेलच. पन ते वेगळं.

म्हंजे त्या बोर्डात माझा फोटो साईडला नि बाजूला आबांच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा बाजूला. हजारो कार्यकर्ते म्हणले की तसे बोर्ड लावायला मारामारी होनारच.

पन बजाबा पाटलांची गावात इज्जतच तशी आहे ना.

ग्रांपंचायतीचे सरपंच ते आमदार.

आबा सदा कार्यकर्त्यांच्या गराड्यात. पन लक्ष मात्र सदा घराकडे.

आमचे मोठे बंधू.. त्यांना साखर कारखान्याची जिम्मेदारी आबांनी लावून दिली. आता लक्ष माझ्याकडे.

बाकी पोरांच्या आईबापांसारखे आबा कधीच नव्हते आनि नाहीत.

बाकी आईबाप पोरांना शाळेत हे शिक्षन काय घ्यायला लावतील नि गुरुजींना भेटाया काय येतील. आबा तसे नाहीत.

म्हनले, हौस असेल तर शिक. जमत असेल तर ठीकच.

पन न शिकल्याने कोनाचे काय अडत नाही.

मग आबा स्वतःचेच उदाहरन देतात. म्हनतात, आम्ही शिकलो नाही.. काय अडले? उलट एक काॅलेज काढून पोरांना शिकायची वेवस्था करून दिली.

काय म्हनता?

पेपरवाले अशांना शिक्षणसम्राट का कायतरी म्हनतात?

असतील.

आबा म्हनतात, भुंकनारे भुंकतात म्हनून हत्ती काय आपली चाल बदलत नाही.

तर सांगत होतो ते माझ्या भविष्याबद्दल.

म्हंजे आमचे ज्योतिषी पळसुले गुरजी म्हनलेले, धाकल्याच्या हातावर राजयोग दिसतो..

तेव्हाच आबांनी ठरवले, अशा राजयोग्यास उगाच शिक्षनाच्या चरकात पिळून काढाचं नाही. एसेसी पर्यंत शिक्षन म्हंजे डोक्यावरनं पानी.

मागे त्या हर्णेवाडीच्या पाटलानं आपल्या पोरासाठी मोठ्ठी डिग्री विकत घेतली.

आबा म्हनले, असला खोटेपना आपल्याला नको. अरं हिंमत असेल तर डिग्रीच्या त्या चिटोऱ्या कागदाला कसली किंमत?

तेव्हा आमचं शिक्षन आता इथंच थांबलं म्हना. दहावी पास!

तशी काॅलेजला जायची हौस माझी, म्हंजे पोरं फटफट्या उडवत धमाल बिमाल करतात त्यासाठी.. पन त्याबरोबर अभ्यासाचं नसतं लचांड कोन लावून घेईल मागं?

आबा म्हनले राजयोग आहे, उगा महत्त्वाची वर्षे शिक्षनात नाही वाया घालवू.

मग आता आबा म्हनले तसे गावची चारदोन कामं करतो. लोकांना मदत करा म्हनले आबा, तशी मदत करत फिरतो. आबांनी वाढदिवशी फटफटी घ्यून दिली त्यावर मातीचा धुरळा उडवत फिरतो.

.. असला रूबाब का? काय विचारता राव?

.. आबा म्हनतात, आपन इथले राजे, म्हंजे मी राजपुत्र. त्या इतमामाने राहावे लागते.. राहतो ही.

अजून सात वर्षे आहेत म्हने.

.. म्हंजे मी रीतसर निवडनुकीला उभा राहीन. निवडून तर येनारच.

.. आबा म्हनतात उगा शिक्षनात वेळ दवडू नको. मतदारसंघ बांधाया घे. त्यासाठी मग गणेशोत्सव, दहीकाला.. क्रिकेटच्या मॅची, बैलगाडया शर्यती नि कुस्तीचे फड..

.. चार पाच वर्षात मी असा मोठा झालो की निवडनुकीला तय्यार ..

..आनि आबा म्हनतात तोवर मजा करून घे. एकदा निवडून आलो की मग राजकारन मागे लागले. आबांची गादी चालवनं सोपं थोडीच आहे?

.. काय म्हनलात? घरानेशाही ही?

डॉक्टरचा पोर डॉक्टर नि इंजिनेरचा इंजिनेर होतो तेव्हा नसते दिसत घरानेशाही? त्यांच्या कामासाठी शिक्षनाची मेहनत लागत असेल, तर आमच्या राजकारना साठीही वेगळी मेहनत लागते .. ती केल्याबिगर कोनी गादीवर बसतो होय?

.. असा राजयोग काय योगायोगाने हाताच्या रेषांत नि कुंडलीत येऊन बसतो?

.. नि तो बसलाय कुंडलीत म्हनून कोनी फुकटफाकट गादी देतोय?

उगाच घरानेशाहीच्या नावे बोटं मोडायची सवय झाली सगळ्यांना.. फॅशन म्हना..

.. आबा डोळे लावून बसलेत ..

घरान्याचे नाव मी अजून मोठे करनार म्हनून. आबा आमदार तर मला मंत्रीपदावर पोहोचायलाच हवे..

झालंच तर मुख्यमंत्रीपद.. ती दूरची बात.. पन..

सध्या फक्त आबा म्हनतात तशी समाजसेवा.. समाजकारन..

.. मग यथावकाश राजकारन नि सत्ताकारन..

मेहनत.

दिवसरात्र मेहनत..

इथे शेळी जाईल जिवानीशी ..

नि हे सगळे म्हनतात .. घरानेशाही कशी?

जो जीता..

शेवटी जिंकलोच!

काय आहे ना जिंकणे महत्त्वाचे.

कोणी कितीही काहीही म्हणो.. जो जीता वही सिंकदर!

मग कोणी खिलाडू वृत्ती दाखवत म्हणेल, हार जीत होत असतेच म्हणे! म्हणणारच! शेवटी काय आहे, शिखरावर एकच जण उभा राहिल इतकी जागा असते. बाकीच्यांना तिथे पोहोचता येत नाही .. मग उगाच प्रयत्न तर केला वगैरे सांत्वन करत बसतात आणि काय!

आणि कसं आहे..

मी जिंकतो तेव्हा माझ्या विरूद्ध जे कोणी आहेत ते हरलेले असतात. म्हणून तर मी जिंकतो की नाही?

सांगायचे काय की शेवटी इतिहास हा जेतेच लिहित असतात.

..त्यांना हवा तसा!

तेव्हा जिंकण्यामागील पडद्यापाठचे काय लिहावे नि काय न लिहावे .. ते ही तेच ठरवणार.

आणि मला तर वाटते की ते ठरवण्यासाठी तरी शेंडी तुटो वा पारंबी.. हड्डी तुटो वा फसली..

जिंकायलाच पाहिजे!

काय आहे ना, एकदा ध्येय ठरले की मार्ग आपोआप निघत जातो. एकदा मार्ग दिसला की त्यातील लघुमार्ग पण दिसत जातो.. म्हणजे शाॅर्टकट..

मोठमोठया डोंगरांना जोडणारे रस्ते काय,

नदी नाल्यावरचे पूल काय

किंवा खाचखळग्यांवर माराव्या लागणाऱ्या उड्या काय..

सारे काही आपोआप जमत जाते..

उड्या म्हणजे सर्व प्रकारच्या.. उंच उड्या लांब उड्या नि कोलांट्या उड्या देखील!

पण म्हणतात ना.. ध्येयाकडे नजर असेल तर बाकी सारे अगदी बिन महत्त्वाचे वाटायला लागते..

मग उड्या काय किंवा बुड्या काय नि धावणे काय किंवा उडणे काय. बुडणे होऊ नये हेच फक्त महत्त्वाचे.

आणि अजून एक..

शर्यत म्हटली की प्रथम येणारा जिंकतो..

म्हणजे बाकीच्यांच्या आधी..

.. तेव्हा त्यांना मागे पाडण्यासाठी त्यांच्या मार्गात अडथळे उभारणे आले. झालेच तर त्यांना जायबंदी करणे आले..

.. इंग्रजीत आॅल इन द गेम म्हणतात ना तसे.. येण केण प्रकारेण!

आपली रेषा मोठी करायची नि त्याचबरोबर दुसऱ्याची पुसत जायची म्हणजे आपली रेषा आहे त्याहून मोठी वाटायलाच हवी!

आणि एक ..

.. ती तशी नैसर्गिकरीत्या लांब आहे हे उच्चरवात सांगता ही यायला हवे!

बाकी शर्यत म्हटली की सारे आलेच..

.. फक्त ते हारजीत चालायचीच वगैरे फालतू तत्वज्ञान नको. लढावे ते जिंकण्यासाठीच!

मग मार्ग महत्त्वाचे नाहीत ..

काय म्हणता? इतिहास काय म्हणेल?

म्हणजे तुमचे लक्षच नाही माझ्याकडे..

इतिहास काय सांगणार?

तेच सांगणार जे जेत्यास सांगायचे आहे!

अहो म्हणून तर जिंकायलाच पाहिजे.

विजय म्हटला की वेगवेगळ्या क्षेत्रातील मुंगळे येऊन लगेच चिकटतातच की..

त्यातील कुणी चटकन ऐतिहासिक दाखल्यांसकट इतिहास लिहून देणार नाही?

आणि काय म्हणता? पुढील पिढी साठी आदर्श?अगदीच नवखे तुम्ही ..

मूल्ये नि आदर्श!

एकदा जिंकलो की त्यासाठी एखादा तत्वचिंतक मुंगळा चिकटेल त्याच्याकडून इतकेही मॅनेज करता येणार नाही?

.. त्याच्याकडून आदर्श नि मूल्ये चिटकवून घेता येतीलच ना?

.. नसेल तर काय उपयोग आहे त्या जिंकण्याचा?

शेवटी काय आहे ..

.. जो जिंकतो तोच राज्य करतो..

.. तोच इतिहास घडवतो नि तोच इतिहास लिहितो.. लिहवून घेतो.

शेवटी..

जो जीता वही सिंकदर हेच एक सत्य..

बाकी सारे.. निखळ असत्य!



एक्झाम गोइंग..

रामराम

नमस्कार

सर्वांना विनम्र प्रणाम

विनयशील सत्शील आणि कार्यशील अशा आमचा सर्वांना साष्टांग प्रणिपात..

जनता जनार्दनाच्या पायी दर पाच वर्षांनी लोटांगण.

आता आम्ही आलोय म्हणजे ..

समजलेच असेल .. परीक्षा जवळ आलीय. आमची.

पंचवार्षिक!

अगदी शाळा काॅलेजात असताना सारखे .. एक्झाम गोइंग आम्ही!

तशी चिंता आम्हाला नाही.

कारण सतत अभ्यास करणाऱ्याचे परीक्षेआधी घोकंपट्टी करणाऱ्या सारखे थोडीच असते? आम्ही सातत्याने हा जनसेवेचा पेपर सोडवत आलो आहोत. तो ही व्यवस्थित.

नीट नेटका नि अगदी वेळेत.

जनसेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण न व्हावे असे काहीच नाही.

म्हणजे अभ्यास उत्तम.

पेपर लिहिणे उत्तम.

आणि मायबाप परीक्षक.. जनता जनार्दन यांच्या कृपेची हमी आहेच!

तेव्हा परीक्षा पार पडेलच.

आमच्या प्रगती पुस्तकावर लाल शेरा पडणार नाहीच..

तरीही ..

तरीही जन हो..

सावध रहावे. कारण गनिम कुठून कसा कावा करेल नि डाव साधेल सांगता येत नाही.

काय म्हणता?

आहे परीक्षा, पण भाषा युद्धाची?

अर्थात!

रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग!

प्रत्यक्ष तुकोबाराय म्हणून गेलेत!

पण तशी आम्ही चिंता करत नाही ..

प्रत्यक्ष परमेश्वरासारखी ही जनता असताना आम्हास कसली चिंता..

म्हणतात ना

देव तारी त्यास कोण मारी ..

तेव्हा तुम्ही सगळे पाठीशी आहातच..

आणि ही परीक्षा युद्धासारखीच महत्त्वाची आहे आमच्यासाठी. रात्रंदिन असावे सावध..

नाहीतर पुढच्या पाच वर्षांत आम्हास नुसतीच जनसेवा करत बसावे लागायचे!

ती आम्ही आताही करतोच.

पण हाती सत्ता असणे

नि

सहीच्या एका फटकाऱ्याने जनसेवेसाठी निर्णय घेणे

किंवा

लाल दिव्याच्या गाडीतून नि डोक्यावर फिरणाऱ्या पंखाधारी विमानातून जनसेवेसाठी राज्य पालथे घालणे.. वेगळेच.

त्यासाठी तर ही परीक्षा.

आणि तुम्ही मायबाप परीक्षक..

काय म्हणालात?

पाच वर्षे कुठे होतो आम्ही?

कुठे असणार?

ते वचन आहे ना..

घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलापाशी.. तसेच आहे आमचे!

आम्ही गेल्या पाच वर्षात कुठे कुठे नसेल गेलो? पूर्वेस ते पश्चिमेस नि उत्तर ते दक्षिण कित्येक गावे, किती एक राज्ये नि विविध कटिबंधातील देशविदेश..

हे सारे पालथे घालताना आमचे लक्ष इकडेच लागून राहिलेले असायचे..

आणि एक..

तसे नसते तर आम्ही परत परीक्षेस बसू शकलो असतो का?

आमच्या पक्षश्रेष्ठींनी आम्हाला परत बसू दिले यातच सर्व आले..

तेव्हा हा वेळ काढून तुमच्या समोर येणे आले..

मतांचा जोगवा मागणे आले..

पदर पसरणे आले..

हात जोडून सर्वांस नमस्कार करणे

नि

साष्टांग प्रणिपात घालणे ही आलेच..

परीक्षा जवळ येत आहे..

परीक्षकांनो तेवढी कृपानजर राहू द्या.. इतकीच विनंती ..

मी.. मोहरलेला मोहरा..!

काय ओळखलंत मला?

नाही ना?

कसं ओळखणार?

ओळखलंत तर मी मी कसा राहणार?

म्हणजे माझा मी पणा मी असा मी असण्यातच आहे ना!

असा मी म्हणजे असा.. सामान्यातिसामान्यातील अति सामान्य!

म्हणजे तसे पाच वर्षात मला असामान्य महत्त्व येते. वीज चमकून उजेड पडावा.. सगळीकडे लख्ख दिसावे क्षणभर तसे.

मी एकाएकी सर्वांस दिसू लागतो.

असे पंचवार्षिक महत्त्व आहे मला. त्या क्षणी मी राजा.

किती छान वाटते सांगू?

आम आदमी!

कुणी इंग्रजी फाडफाड फाडत त्याला मँगो मॅन म्हणतात म्हणे!

म्हणोत!

नावात काय आहे?

आम म्हणा की मँगो म्हणा.. वस्तुस्थिती तीच!

पण किती छान वाटते..

एरवी ढुंकून न पाहणारे, गाड्या उडवत जाणारे नि हिंदीत नकचढे म्हणतात तसे शुभ्र धवल वस्त्रांकित सारे आता मारे धावतात माझ्यामागे..

खरं सांगतो,

तेव्हा आयुष्याचे सार्थ सार्थक झाल्यासारखे वाटायला लागते. कुणाच्या तालावर पाच वर्ष नाचल्यावर आपल्या हाताच्या बोटावर पाच दिवस का होईना त्याच कुणाला नाचवताना किती मजा येते कसे सांगू?

खरेतर त्याच आशेवर दिवस काढत असतो मी.

तितकेच समाधान!

एरव्ही तसे पेपराबिपरात नि टीव्ही रेडिओवर याच लोकांना माझ्या भल्यासाठी झटण्यासाठी कढ काढताना पाहात असतो मी.

माझे भले व्हावे म्हणून दिनरात्र एक करणारे नेतेगण..

आणि

तशा बातम्या छापून आणणारे नेतेगण..

अगदी गाव.. शहर.. राज्य.. नि देश पातळीवर माझ्याच भल्याचा विचार चालतो म्हणतात ते.

मोठी माणसं ती..

नव्हे, मोठीच माणसं ती!

खरे बोलतील की नाही?

नव्हे .. खरेच बोलतील की नाही?

त्यांचा हात माझ्या हातात आहे असेही म्हणतात ते!

अगदी तुकोबाराया म्हणतात तसे..

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती!

तुकोबा देवाला म्हणालेले तसे..

आणि आमच्यासाठी मात्र हेच..

कर्ते करविते.. देवाचे प्रतिनिधी!

जेथे जातो तेथे आमच्या सारख्या आम आदमीच्या हाती हात देणारे.

काय म्हणालात? हात दाखवणारे?

नाही हो. असं हात दाखवून अवलक्षण नको.

.. तर नमस्कार मंडळी.

लोकशाहीचा पंचवार्षिकोत्सव जवळ येत चाललाय.

त्या वंसतोत्सवाची झुळूक अंगावरून जायला लागली की.. गल्ली गल्लीत नेतेगणांचे कोकिळ कूजन सुरू होते..

वसंतात कोकिळेच्या कूजनाबरोबर आंब्याला मोहर येतो

.. नि मग या मँगो मॅनलाही मोहरून जायला होते..

शाही लोकशाहीतील मी मोहरा..

मोहरून जाणारच!

मानव तितुका..

बालपणीचा काळ सुखाचा..

नुसता सुखाचाच नाही ..

तर शिकण्याचा..

जडणघडणीचा..

कोणाच्या ध्यानात नाही येणार पण आम्ही त्यातूनच शिकत गेलोय. घडत गेलोय..

आज आम्ही जसे दिसतोय ना.. त्याची मुळं त्या बालपणात आहेत बरं..

जसे दिसतोय म्हणजे कसे?

कसे काय विचारताय तुम्ही?

कसे म्हणजे हे असे!

दिमतीला नोकर चाकर.

ही पांढरी शुभ्र गाडी ..

ते आजूबाजूस उभे आहेत .. गार्डस् म्हणतात त्यांना ते..

आधी दंडुकेधारी एखाद दुसरा असायचा ..

नि आता बंदूकधारी ..

आमची प्रगती अशीच मोजली जाते.. जितके आम्ही सत्तासोपान वर वर चढत जाऊ, तितके अधिकार अधिक..

..तितके गार्डस् अधिक ..

.. मग आम्ही यशस्वी अधिक..

पण मुद्दा तो नाही ..

आमच्या या यशामागे आमची अखंड मेहनत आहे.

जनसेवेचा कळवळा आहे..

देशोद्धाराची तळमळ आहे..

तळागाळातल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही दिनरात मेहनत करतो..

आम्ही लहानपणी तसे हूड होतो म्हणे.

मातोश्री आमच्या म्हणतात .. आठवणी काढतात अजूनही. तुम्ही पाहिला असेलच तो आमचा फोटो..

अहो, कसला काय विचारताय?

आमच्यासारखे आम्ही मातेच्या पाया पडतानाचा.

काय म्हणता? सगळेच आपापल्या आईच्या पाया पडतात?

काय म्हणावे तुम्हाला?

अहो.. आया सगळ्या सारख्या असतील .. पण त्यांची मुले? ती तर सारखी नसतात ना? त्या फोटोत आम्ही किती नम्र दिसत आहोत ते पहा..

तुम्ही लोक असेच.. काय पहावे हे ही सांगावे लागते तुम्हाला!

तर सांगत होतो ते बालपणाबद्दल..

आमची शाळा..

तशी फार मोठी नव्हती.

दोन गुरूजी शाळा हाकायचे.

हाकायचे म्हणायचे कारण शाळा आमची शिस्तीची.

बनसोडे गुरूजी नि दुसरे भावे गुरूजी.

गोष्ट जुनी.

म्हणजे आता किती वर्षे लोटली.

ध्येयवाद नि असं काय काय याची तेव्हा गुरूजनांना आस काय असायची नि सगळे त्याने भारावून बिरावून जात शाळेत काय काय शिकवायचे. फॅशन म्हणाना!

आमचे दोन्ही गुरूजन हे असेच ..

त्यांनी आम्हाला नुसते विषयच नाहीत शिकवले.. जीवनशिक्षण दिले म्हणा ना..

ते आज ही उपयोगी पडते आहे.

म्हणजे तसे सारेच लक्षात आहे असे नाही.

खरेतर बहुतेक सारे विसरलोच आम्ही..

पण एक गोष्ट आम्ही अजून विसरलो नाही.

ती म्हणजे मानव सर्व एकच आहे.

आणि संतसज्जनही सांगून गेले ते आम्हास पटते.. मानव तितुका एकच आहे..

अर्थातच ..

तसे समाजात उच्च नीच असायचे..

असमानता असायचीच..

साधी जमीन पण उंच सखल असते..

हाताची बोटे सगळी सारखी नसतात..

प्राणी नि झाडे एकाच जातीतील असली तरी वेगवेगळी असतात..

तरीही ..

माणूस सर्व एकच आहे..

द्रष्ट्या संतांनी सांगून ठेवलेय ते पटते. पटायलाच हवे!

कारण आम्हाला ठाऊक आहे..

माणूस कोणीही असो..

गरीब-श्रीमंत की कुठल्या जाती,धर्म, पंथाचा .. कुठल्याही भाषेचा की अजून कोणी..

सगळा मानव जिथून तिथून एकच आहे..

कारण ..

सगळ्यांच्या मताची किंमत मतपेटीत एकच आहे..

मानव तितुका एकच आहे हे खरंय..

कारण ..

आम्हास ठाऊक आहे..

.. प्रत्येक माणूस हा एक मतदार आहे!

.. आणि त्याच्या मताची किंमत पण एकच आहे.

म्हटले ना, ते बाळकडू कसे उपयोगी पडतेय आता ही! पहा.. बाळपणीच्या शिकवणुकीचा जडणघडणीत वाटा किती मोठा असतो ते..

सत्यमेव जयते!

काय मग?

ठोकले की नाही मस्तपैकी.

ऐकत नाही म्हणजे काय!

अहो, या लोकांना असेच पाहिजे.

लातोंके बूत.. बातोंसे कभी मानते हैं?

उगाच यांच्याशी वादावादी कशाला?

आमचे हे असेच. एक घाव दोन तुकडे.

उगाच गुळमुळीत बोलायला जमत नाही आपल्याला.

वाद घालायला तर नाहीच.

नि कुणाचे ऐकून घ्यायला तर नाहीच नाही.

आमचे ऐकत नाही म्हणजे काय?

आम्ही बोललो ते काय चूक?

आणि चूक असेल तर आमच्या आजूबाजूचे माना हलवतात ते काय उगीच?

आमच्या इतके जनहित कोणालाच नाही समजत.

खरेतर आमच्याइतके काहीच कोणाला नाही समजत.

पण या लोकांना तितकी अक्कल असेल तर ना!

प्रत्यक्ष आमच्याशी वाद आणि आमच्या भूमिकेबद्दल प्रतिवाद?

हे म्हणजे फार झाले.

फारच डोक्यावरून पाणी गेले.

असले जनहितशत्रू आसपास आहेत म्हणजे प्रगती बोंबललीच..

पण नाही.

आम्ही असले काही होऊ देणार नाही.

मारा नि ठोका.

मुस्कटदाबी करा..

काही ही करा.

पण या शंकासुरांच्या पिलावळीचा बंदोबस्त करा ..

करा म्हणजे आम्हीच करणार .. बंदोबस्त.

तसे आदेशच आहेत आमचे.

काय म्हणता?

कायद्याने हे होऊ शकत नाही?

काय तुम्ही?

अहो कायदा कायदा म्हणजे काय?

चार कागदावर खरडलेले चार दोन शब्द. ते ही मानवनिर्मित!

मला सांगा.. कायदा माणसासाठी आहे की माणूस कायद्यासाठी?

आणि आम्ही असताना हे कसले कायद्याचे बेकायदा अवडंबर?

अहो, एकच गोष्ट महत्त्वाची ..

आमची भूमिका म्हणजे काळ्या दगडावरची ओल्या खडूनी काढलेली पांढरी रेघ.

ती कोणीच पुसून काढू शकत नाही.

त्यांनी असे बोलावे? आमचा नाइलाज होतो ..

कायदा गाढव असेल ..

.. पण आम्ही तर नाही!

आणि ते काय म्हणतात.. कायदेशीर कारवाई वगैरे .. ती होईल तेव्हा होईल..

पण आमचा विश्वास..

झटपट ॲक्शन वर..

आणि महत्त्वाचे,

आमचा अविश्वास आहे..

बोलण्यावर..

तुम्हाला सांगतो,

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे म्हणतात..

मग आम्ही फक्त त्या विरोधी मत व्यक्त करणाऱ्यास असेच सोडून द्यावे?

मारणे आणि ठोकणे ही क्रियाशील आयुधे हाती असताना?

काय म्हणता?

आमच्यासारख्या व्यक्तीस शोभत नाही?

अहो अगदीच काय म्हणतात ते हे आहात तुम्ही.

एकतर आम्ही आम्ही आहोत ते यामुळेच.

आणि तुम्हाला काय वाटले, आमच्या सही शिक्क्याची वाट पाहून होते ठोकाठोकी?

जे होते ते आमच्या इच्छेने .. पण कोणास न समजता..

हे सारे आम्ही तुम्हाला कसे सांगू शकतो म्हणता?

अहो.. आम्ही सांगतोय.. ते तुम्ही दुसऱ्या कोणास सांगून पहा नुसते..

त्यांचा विश्वास तर नाहीच बसणार .. वर वेड्यात काढतील तुम्हालाच..

आमचा अधिक्षेप करणाऱ्यास तेच बाहेरच्या बाहेर बघून घेतील..

तशी सोय आम्हीच ठेवलीय करून..

आणि..

तशी आमची माणसं आहेतच ठेवून लक्ष .. सदा दक्ष ..

डोळ्यांत तेल घालून.. पकडतील भक्ष्य!

काय आहे ना..

सामोपचारावरचा आमचा असला नसलेला विश्वास उडलाय आता पुरता..

बस झाली ती गुळमुळीत अहिंसा .. नि सत्यमेव जयते वगैरे ..

नाही नाही ..

ते हिंसा परमो धर्मच ठीक..

पण सत्यमेव जयते हे मात्र खरेच.. म्हणजे आधी विश्वास नव्हता पण सत्ये ध्यानी आलीयेत आमच्या..

खरी सत्ये कोणती ते उमगलेय आम्हाला..

एक घाव .. दोनशे तुकडे..

हे एक सत्य ..

आम्ही तारणहार ..

आम्ही तारणहारच.. नव्हे,

आम्हीच तारणहार

हे अजून एक सत्य ..

आणि अहिंसेचे नसते लाड पुरवून झाले..

आता धरी मी शस्त्र करी!

म्हणजे हिंसेला पर्याय नाहीच.

हे एक अंतिम सत्य!

.. आणि या नव सत्यांचा विजय म्हणजेच..

सत्यमेव जयते!

कायद्याचे बोल..

हॅलो..

आयॅम द लॉ.

काय म्हणता? फादर की मदर इन लॉ?

की ब्रदर किंवा सिस्टर इन लॉ?

काहीतरीच.

उगाच आपले काही बोलायचे विनोदी समजून. अक्कल दाखवायची म्हणून.

मी लॉ आॅफ द लँड.

मी कायदा.

काही लोक ज्यास घाबरून असतात नि त्याचे पालन करतात .. ते सामान्य

आणि ज्यास मी स्वतः घाबरून असतो.. ते असामान्य..

पण काहीही असो..

दोघांनाही काही झाले तरी माझी दखल ही घ्यावीच लागते!

सामान्यांचे तर समजण्यासारखे आहे. बिचारे माझी कक्षा ओलांडली गेली जरी चुकूनही तरी त्याची फळे भोगतात.

माझे हात आजानुबाहू रामासारखे लांब आणि सर्वव्यापी आहेत म्हणून त्यास भीती दाखवली जाते..

तेच लांब हात असामान्यांसाठी आखडून नि जखडून जातात..

पण तरीही हे असामान्य माझा कीस पाडतात ..कारण मोडायचे तर असते त्यांना मला.. पण ते माझ्याच चौकटीत राहून!

हीच तर माझी गंमत आहे!

ते बनवणारे माझ्यात तोडमोड करण्याची शक्यता पण माझ्यातच घालून ठेवतात.

मग सगळी मोठमोठी वकिली डोकी जमून माझ्याच पोटातून मलाच गारद करण्याचा मार्ग शोधत बसतात!

खरेतर सारे पाहून चकरावयास होते अगदी.

कोणी 'कायद्याचे बोला' ची फोड 'काय द्या चं बोला' अशी पण बेधडक करू धजतात..

आणि मी?

मी करून करून करणार तो काय?

सारे काही मूक पाहात असतो.

माझ्या अंमलबजावणीचे सोंग आणण्यासाठी झटणारे उच्चपदस्थ..

माझे राज्य सगळीकडे सुस्थापित करत निवडणूक जिंकून त्या पदावर पोहोचणारी नामदार मंडळी..

मग पंचवार्षिक सत्तासत्रांत माझ्या नवनवीन प्रारूपांस जन्म देणारी हुशार मंडळी..

माझ्या नावाचा जप करत मलाच पायदळी तुडवत नामानिराळे होणारे महाभाग ..

माझ्यातील त्रुटी हेरून त्यांचा फायदा करवून देणारी कायदेतज्ञ म्हणवणारी काळे कोटवाली मंडळी..

मग माझ्यामुळे कधी न कधी न्याय मिळेल या आशेवर हेलपाटे घालणारी सामान्य जनता..

सारे काही माझ्याच नजरेसमोर ..

नाकाखाली..

कित्येकदा नाकावर टिच्चून ..

आणि सरते शेवटी मला मिळणारी काॅम्प्लिमेंट ती काय..

कायदा गाढव असतो!

मनुष्य मात्राचा स्वभाव कसा कोळून भरलाय या वाक्यात!

मला बनवणारे ..

माझा अर्थ लावणारे..

माझी अंमलबजावणी करणारे..

किंवा तसा भास निर्माण करणारे ..

वेळोवेळी माझ्यात सुधारणा म्हणत बदल करणारे ..

माझे परिपूर्ण स्वरूप न बनवता त्यात पळवाटा बनवणारे ..

कोणास सहज आकलन न होईल असे माझे स्वरूप बनवून आपली वकिली दुकाने चालवण्याची सोय करणारे..

वेळ येताच माझ्याच आधारे मला पायदळी तुडवणारे..

माझे क्लिष्ट रूप न समजल्याने ते न समजता 'ते करतील तो कायदा' हे मूकपणे मान्य करणारे ..

सारे काही करणारा तो मनुष्यच..

म्हणजे यातील काहीच माझ्या हाती नसूनही शेवटी काय?

कायदा गाढव आहे!

कसा मी असा मी माहिती असूनही ..

मीच गाढव!

अर्थात हे खोडून काढण्याचा गाढवपणा मी करणार नाही.

करूही शकणार नाही

कारण.. कारण एकच..

एकाबाजूने मला गाढव म्हणणारी मंडळी दुसरीकडे कायदेमंडळात बसून मीच कसा सर्वोच्च हे उच्च रवात सांगत असतात!

तेव्हा देवाधिदेवांनीही स्तुतीस भुलावे हा कायदा मात्र मी पाळल्याशिवाय कसा राहिन ..

घोडा म्हणा.. नाहीतर गाढव म्हणा..

शेवटी मीच नामधारी का होईना.. सर्वेसर्वा .. बोलविता धनी कुणी दुसरा असला तरीही .. सर्वोच्च स्थानी..

त्याचा निषेध करायला कुणी कितीही काहीही म्हटले तरी मी खरेच गाढव थोडीच आहे?

बकरे पाहिजेत ..

कुणी बकरा बनताय का बकरा?

बकरा नव्हे खरं तर.. अनेकवचनी.. बकरे हवेत..

म्हणजे काय आहे आमचे काम सुरू आहे.

काम म्हणजे ..?

आम्ही कार्यसम्राट.

कार्यसम्राट म्हणजे अत्यंत कार्यक्षम असे आम्ही नेते.

कार्य म्हणजे काय?

आम्ही पुढारी आहोत तेव्हा आमच्या कार्यास काही सीमा असू शकतात का?

असीम काम हीच ओळख आमची. अविरत कार्यरत असे आम्ही. आम्ही म्हणजे सम्राट. कार्यसम्राट.

नुसतेच ते नव्हे तर आमच्या मतदारसंघातले हृदयसम्राट आम्ही.

खरे सांगतो,

आरशात पाहतो आम्ही सकाळी तर डोक्यावर आम्हाला मुकुट दिसतो. अदृश्य असेल इतरांसाठी पण आमच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आणि निष्ठावंत अनुयायांनी चढवलेला हा सोनेरी मुकुट. त्याची झळाळी कोणाला दिसत दुरून नसेल.

पण आम्हाला दिसते.

आणि तीच चमक आमच्या कामात मग उतरते. अर्थात चमक दिसायला अंगात धमक हवीच.

ती आहे म्हणून तर आम्ही कामाचे डोंगर उभारलेत.

.. तुम्ही नुसती चक्कर मारलीत आमच्या मतदारसंघात तरी जागोजागी आमच्या नावाचे फलक दिसतील. म्हणजे रस्ते म्हणू नका, गटारे म्हणून नका, पदपथ म्हणू नका, पाणपोई म्हणू नका..

.. सगळीकडे आम्ही कार्य करून आमची छाप सोडली आहे. आमच्या विभागात तर शौचालया मागून शौचालये दिसतील. त्यातील काही शौचालयांमध्ये तर आम्ही पाणीसुद्धा पुरवले आहे. आमचे कार्य हे असेच.

सर्व बांधकामांवर उद्घाटक म्हणून आमच्या नावाचे संगमरवरी दगड बसवले आहेत.

- मरावे परी शिलारूपी उरावे म्हणतात ते ह्यासच!

.. तर असे आम्ही जनसेवक. जनहितदक्ष अन जनतेवर लक्ष.

- आणि आमचे जनसेवेचे लक्ष्य नि आम्ही बनतो विरोधकांचे भक्ष्य.

पण जनतेच्या प्रेमापुढे कोणाचे काय चालते होय?

आमच्या कार्यडोंगरास पोखरून ते काढतात.. आमच्या चुकांचे उंदीर!

तर सांगायचे हेच आहे आम्हाला..

.. आम्हाला आमच्या मातोश्री आठवतात. देवाघरी गेल्या. पुण्यात्मा. त्या म्हणायच्या नेहमी, जो काम करतो त्याच्याकडूनच चुका होतात. त्यामुळे चूक होण्याची भीती वाटू देऊ नका. आम्ही लहान असताना आम्ही पुढे कार्यसम्राट बनणार याचा अंदाज त्या माऊलीस आला असावा की काय?

असणार.

माताच ती.

पण हे राजकारण!

राजकारण म्हणजे गजकरण!

इकडे चुका चालत नाहीत.

म्हणजे चुका केलेल्या चालतात पण त्या आम्ही करून चालत नाहीत..

म्हणजे.. सांगणे मुश्किल आहे थोडे..

गोंधळ आमच्या मनात नाही .. सांगण्यात आहे..

तर सांगायचे हेच..

आम्ही सदा कार्यरत रहावे.

त्यात धडाडीने पुढे जात रहावे ..

तडकाफडकी निर्णय घ्यावेत..

जास्त विचार करणे आमच्या स्वभावात बसत नाही. आधी कृती मग विचार .. आमच्या कामाच्या धडाक्याचे रहस्य आहे ते..

.. मग

.. चांगल्या सर्व कामांचे श्रेय आम्हाला मिळावे. मिळत रहावे. आमचे कार्यकर्ते आमचे गुणगान करत फिरावेत..

आणि..

आणि आम्हाला निष्ठावंत बकरे हवेत..

.. होय.. बकरेच!

जे आमच्या सर्व चुकांची जबाबदारी घेतील..

असे बकरे जे चुकीचे प्रायश्चित घेण्यास..

राजीनामे देण्यास..

आपल्या तपासयंत्रणांच्या तपासास तोंड देण्यास..

वेळप्रसंगी तुरूंगात जाण्यास सदा तयार असतील ..

..असे बकरे हवेत..

.. त्यांच्या जोरावर आम्ही फक्त योग्य तेच निर्णय घेतो अशी मिथके पसरतील..

.. आम्ही आकाशाएवढे होत राहू..

हवेत आम्हाला.. असे निष्ठावंत बकरे..

कुणाला सांगू नका..

आम्ही आतील गोटातील रहस्य भेद करतोय तो.. आपल्यातच राहू द्यात..

.. पण असतील कुणी निष्ठावान बकरा बनायला तयार तर पाठवून द्या..

.. नाही, तसे त्यांना कमी काही नाही पडू देणार .. आम्हाला आमचे नाव कमवायचे

.. नि नाव बनवून ठेवायचे देखील ..

तर थोडी किंमत तर मोजावी लागणार .. ती पैशांत मोजू आम्ही.

.. आणि नाव सलामत तर पैशांची काय कमी?

- तुमच्या आमच्यात म्हणून ..

आहेत कुणी पाहण्यात .. बकरा बनण्यास योग्य उमेदवार?

द्या त्वरित पाठवून..

मी.. नंदी!

नमस्कार मंडळी.

मी.. मी कोण म्हणून सांगितलेच पाहिजे नाही का?

मी आहे शंकराच्या पिंडीसमोरचा नंदी. नंदीबैल नव्हे .. नंदीच. उगाच मला बैल बिल समजू नका. नाही म्हणजे मान हलवतो मी तशी, पण ती हलवली नाही तर साहेबांकडे काम मिळेल का? त्यामुळे तशी मान हलताना दिसते माझी. पण म्हणून मी काय डायरेक्ट बैल?

तर.. साहेब ..

साहेब म्हणजे आमचे आमदार नामदार कामदार.. आणि त्यांचे आम्ही भालदार चोपदार.. साहेबांनी दार उघडून आत घेतलेय एकदा त्यांच्या पंखांखाली.. आता त्यांच्या त्यांच्यावर हो ला हो मिळवणे हे माझे कामच आहे.. नाही तर खाल्ल्या मिठाचा विसर पडेल ..

आणि आता साहेबांकडे राहून अळणी आयुष्याची सवय ही गेलीय..

तर मंडळी मी नंदी..

साहेबांकडे काही काम.. नव्हे काही ही काम निघाले ना तर मला सांगा.. बिनदिक्कत सांगा.. चुकलोच.. मला सांगा नाही, तर मलाच सांगा.. कारण नंदीला

हात लावल्यावाचून शंकरास नमस्कार नाही करता येत.. तशी प्रथाच आहे.. आणि आपल्या प्रथा परंपरा आपण सांभाळल्याच पाहिजेत.

- असा गाठ शेवटी साहेबांशीच आहे..

त्याचे काय आहे पहाटे चार वाजता साहेबांचा दिनक्रम सुरू होतो तिथपासून रात्री साहेबांचा डोळा लागेतोवर माझ्यावाचून साहेबांचे पान हलेल तर शपथ! मग साहेब कोठेही असोत. म्हणजे आपल्या ह्या वाड्यावर नाहीतर कोठल्यातरी गावी. सदा त्यांच्या तोंडी नाव माझेच,

सदा,त्या ह्यांना फोन केला का..

सदा ते हे आले का?

सदा, दिल्लीची फ्लाइट बघ ..

सदा, त्या ह्यांची ती मेल आली का?

सदा, हे बघ.. नि ते कर

सदा, हे कर नि ते बघ ..

सदा, अमुक नि सदा तमुक..

सदावाचून साहेबांचे काम सदा अडते नि अडकते..

सदा म्हणजे मी, सदानंद सरवटे.

गेली पंधरा वर्ष साहेबांचा डावा हात बनून आहे. तशी पद्धत उजवा हात म्हणायची असते..

म्हणजे नेताजी पालकर म्हणजे महाराजांचा उजवा हात .. तसा मी डावा हात! कारण आमचे साहेब पडले डावखुरे त्यामुळे मी त्यांचा डावा हात म्हणावे.

तर. वर्षात साहेब किती पुढे निघून आले त्याचा मी साक्षी आहे. अगदी मध्ये हरले निवडणूक तरीही साहेबांना मी सोडले नाही. नि साहेबांनी मला. राजकारणात असले चढ उतार व्हायचेच.. हो की नाही?

आता हे सारे का सांगतोय मी?

तर आज आता मी मोकळा आहे.. साहेब अधिवेशनात बिझी आहेत. मी सध्या रिकामाच. तर म्हटले सांगावे.. ह्या कोकणातील छोट्याश्या खेड्यातून आलेला हा सरवट्यांचा सदानंद कुठे पोहोचला ते. अगदी सत्तेच्या वर्तुळाच्या आत. आमचे साहेब म्हणजे किती मोठे नेते नि भाग्यविधाते ते मी सांगायला नकोच. साहेबांच्या नावाचा डंका वाजलेला सगळीकडे ऐकायला येतो. सांगायचा मुद्दा.. साहेब इतके मोठे तर त्यांचा हा डावा हात.. तो किती मोठा असेल? पोंबुर्प्याचा हा सरवटे आज मंत्रालयाच्या वातानुकूलित केबिनीत बसून आजूबाजूचे सारे पाहात असतो.. एखादा कंपाऊंडर कसा डॉक्टरच्या हाताच्या इलाजांकडे नि करामतींकडे पाहात असतो तसा..

आणि साहेबांचे पान हलत नाही असा विश्वासू आणि आतील गोटातला मी. सदानंद सरवटे.

काय म्हणता?

विश्वास बसत नाही?

न बसू देत. म्हणजे काय आहे, एकदा तुम्ही साहेबांना भेटायला या. या म्हणजे याच.

- तशी त्यांची अपॉईंटमेंट मिळते का ते बघा.

बघा म्हणजे बघाच एकदा.

- मग तुमच्या कामासाठी साहेबांनी सवड काढावी म्हणून तुम्ही अपॉईंटमेंटसाठी आटापिटा कराल.. फोन काय कराल.. इकडून तिकडून प्रयत्न काय कराल..

- मग तुमच्या लक्षात येईल ..

जुन्या जमान्यात गृहसजावटीचा सोपा मार्ग झारापकरांकडून जायचा तसा या जमान्यात साहेबांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग या सदानंद सरवट्यांकडून जातो.

कुणी तर एकदा गंमतीने म्हणाले ही, साहेबांना स्वतःला स्वतःचीच अपॉईंटमेंट हवी असेल तरी या सदाची मदत लागेल.

कुणी म्हणतो, चहापेक्षा चहाचा कपच जास्त गरम असतो!

कोणी काय बोलावे यावर आपला काय कंट्रोल आहे का?

बोलणारे बोलतात, ऐकणारे ऐकतात.. माझ्यासारखे एका कानाने ऐकून दुसऱ्याने सोडून देतात ..

.. शेवटी साहेबांची सेवा हाच जीवनाचा उद्देश .. त्यासाठीच तर सारे काही!

.. शेवटी साहेबांशिवाय मी कोण? कुणी सदानंद म्हणा, कुणी सरवटे म्हणा कुणी सरवटे साहेब म्हणा..

.. मी साहेबांच्या दरबारातील एकनिष्ठ.. शंकरासमोरचा नंदी मी..

नंदीच..

पण काही हरकत नाही ..

- भले कोणी नंदीबैल का म्हणाना..

प्रश्न न पडती मजला..

प्रश्नच नाही हो.

म्हणजे मला पडणारा कुठला प्रश्नच नाही!

गेले ते दिवस..

काय म्हणता? जिज्ञासा?

एकेकाळी होता जिज्ञासा म्हणून कुठला शब्द होता भाषेत. आता मी तो शब्दकोशातून बाद केला..

पूर्वी मोठे लोक सांगायचे ..

पडू द्यात प्रश्न. शोधा उत्तरे.

यातूनच जग पुढे जाईल!

जात असेल खरेच?

नाही, हा प्रश्न देखील नाही विचारणार मी.

कारण प्रश्न पडला की मग त्याच्या उत्तरामागे धावावे लागते.

नाहीतर त्यासाठी तो कोणास विचारावा लागतो.

नि एकदा प्रश्न पडला की त्या मागोमाग उपप्रश्न कुत्र्यांच्या छत्र्यांसारखे उपजतात.

मग त्यांचे अजून उपप्रश्न!

किंवा प्रतिप्रश्न देखील!

ही अशी प्रश्न जंजाळ साखळी..

त्या साखळीचे साखळदंड..

नि त्यात अडकलेला प्रश्नकर्ता नि

कधी कधी त्याचा जीव!

कोणी सांगितलीय इतकी यातायात?

तसे आम्ही प्रश्न विचारत नाही असे नाही.

आम्हास तर तयार उत्तरे आमच्या लोकोत्तर धुरीणांच्या वक्तव्यात मिळतात ..

त्या उत्तरावरून आम्ही प्रश्न फ्रेम करतो..

म्हणजे आधी उत्तर मग प्रश्न!

उलटी असली तरी आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेली गंगा आहे ती!

आणि खरे सांगायचं ना तर आमच्या धुरीणांस आम्हीच आवडतो.

म्हणजे यामुळेच आवडतो.

आम्ही म्हणजे, मी आणि समविचारी..

सम विचारी म्हणजे सारखाच विचार करत कसलाच विचार न करणारी मंडळी!

आणि कसलाच प्रश्न पडू न देणारे आम्ही सारे!

आम्ही या राज्याचे आदर्श नागरिक आहोत..

अर्थात!

आज्ञाधारकपणा हा आमचा लहानपणापासूनच आदर्श गुण आहे..

उलट प्रश्न न करणे हे बाळकडू मिळाले आहे..

त्या बालपणीच्या शिकवणीचा मोठेपणी असा उपयोग होतो आहे..

उगाच नाही .. संस्कारांचे महत्त्व सांगितलेय आपल्या संस्कृतीत!

तेव्हा प्रश्न न पडती मजला.

मी ऐकतो ती फक्त उत्तरे ..

किंवा आमच्या महनीय माननीय आदरणीय व्यक्तींनी खणून काढलेले प्रश्न ..

इतिहास, भूगोल नि नागरिक शास्त्राबद्दलचे..

अर्थात मी फक्त एक श्रोता..

ऐकलेले प्रश्नही फक्त ऐकणारा ..

त्यावर प्रश्न .. प्रतिप्रश्न पडत नाहीत मला..

कारण मी एक जबाबदार नागरिक आहे.. म्हणूनच..

प्रश्न न पडती मजला..

धुरळा!

काय मग. पाह्यलं का न्हाई?

म्हनलं व्हतं ना..

तो दौलत्या.. दाती गवत धरून शरण आलाच पाह्यजे!

न यून जातो कुटं?

राजकारनात उगा न्हाई काळ्याचे पांढ्रे झाले..

ह्ये झालेत ते टकुरं वापरून वापरून.

निस्ते उन्हातान्हात फिरून न्हवं त्या संभा पाटलासारखे.

न्हाई तर काय त्या ग्रांपंचायतीच्या पंचायती सोडवत सोडवत औक्षभर गावात नस्तो बसलो मुंडासे बांधून.

हां. तसा वाडा हाय.. शेती हाय.. गावात वट हाय.. पन गावातील वट गावापुर्ती..

इकडनं ही जीपगाडी उडवित जायाची शान काही और.

आम्ही पाह्यलंय ना..

गावच्या रस्त्यावर गाडी आमची शिरली रं शिरली की सारे गावकरी कामधाम सोडून हात धरून उबं राहतात.

शहरातली छोटी असामी पन गावच्या बड्या असामीहून मोठी अस्तिया.. आन आम्हीतर बोलून चालून शहरात मोठी हस्ती..

म्हंजे काय हाये की गावात लोक्कलांचा सीझन आला रे आला की शहरात मन रमेना होतंया. अगदी अदिवेशन असो की शीएमसाहेबांची आर्डर.. आम्ही तडक गाडी घ्यून गावात.

आपल्या लोकांनला उत्तेजन आपन न्हाई तर कोन देनार?

तर आमची जीप शिरली रं शिरली की सारे हात जोडून मातीच्या सडकेच्या कडंला.

गावंच त्ये. मातीचा कच्चा रस्ता.. धुरळा उडतोया.. कितीबी इकास करा.. धुरळा काय उडायचा थांबत न्हाई ..

पन तरीबी एक सांगतो, त्ये पाहून आम्हांस भारी वाटतं.. आम्ही त्या धुरळ्यावानी..

म्हंजे कसं हाय ना..

आम्ही म्हंजे तुफान..

म्हंजे विलेक्शनीत ती आमची विलक्षन घोशणा व्हती..

बसवा इरोधकांचं दुकान.. निवडा इकासाचे तुफान..

तर तुफान उठलं की धुरळा उडतोया.. तसं आम्ही बी..

धुरळ्यावानी उडतोया नि घराघरातमंदी जाऊन पोचतोया..

आन त्याबरोबर आमचे नाव बी.

मोठे मालक आलेत ..

असला धुरळा उडवनारी दुसरी गाडी पंचक्रोशीत न्हाई ..

सारे कवतिकाने बोलत राहत्यात. आम्ही आइकत राहतो.

राजकारनाचे ते काय म्हनतात ते सार्थक झाल्यावानी वाटतं..

गाव तसं छोटंस..

त्यातून आम्ही वर उटत उटत इथवर ..

आम्हास स्वतःवरच गर्व वाटतोया..

त्या गर्वात मग आम्ही गच्चीत यून उबे राह्यलो की जानवतंय..

असलं पक्कं घर गावात कुनाचं बी न्हाई ..

एक ते आम्ही.. आमचं ते घर..

घर कसलं वाडाच म्हना ना..

दाराशी बईलगाडी नि दुचाकी नि चारचाकी..

श्येत नि त्यातील विहीर ..

राबनारे नोकरचाकर नि गडी आन बाया..

किती सांगावं..

आम्ही समाधानानं गच्चीतून समदं पाहतो..

एक ती दिसते आम्ही उबे असलेली आमची गढी..

आन बाकी समदा..

सगळीकडे पसरलेला ..

निसता

धुरळाच धुरळा..

पंटर नं. वन

सलाम सगल्यांना.

आपन कोन विचारताय?

आपन छोटा हकीम.

तसं आपलं नाव वेगलंय पण सारे छोटा हकीम बोलतात आपल्याला.

साह्यबानी आपल्या पंखाखाली घेतला त्या अदोगर आपन एका हकिमाकडे कामाला होता. म्हणून छोटा हकीम!

काय गडबड .. म्हनजे गंमत..

तिकडे आपन लोकानच्या जखमा बांदायच्या.. अवशद पानी द्यायचा..

इकडे त्याच्या बरोबर उलटा काम!

लोकानला जखमा करायच्या .. काम जोखीमभरलं पन टेन्शन नाय.. कायपन!

साह्येब असताना कसलं टेन्शनवेन्शन?

म्हनजे आपन तीनदा आत जाऊन आलो. ही चवथी बारी.

साह्येब म्हनला, टेन्शन नाय कायपन छोटू.

साह्येब शब्दाचा पक्का. घरी पयसे पाटवायचा. आन ह्या धंद्यातल्या ट्रिक तर आपन इकडेच शिकला.. इकडे म्हनजे जेलामधी. या लायनीत शिकायचं तर मधूनमधून जेलात टरेनिंग घ्यायलाच पायजे.

आन साह्यबाचं काम म्हनजे ..

साह्येब बोलतो, प्रश्न विचारू नको..

साहेब बोल्ला..

राडा घाल.. घालायचा..

ह्याला झोड .. झोडायचा..

कुनाला तुडव.. कुनाला उडव..

साला राजकारनात हे चालायचेच..

त्यात आपन साह्येबाचा राइट हँड एकदम..

साह्येबाकडं आलो तेव्हा साह्येब आज हाय तितका मोठा नव्हता.

साह्येब म्हनतो पन, साला, तू आन तुज्यासारखे पंटर लोक हायेत म्हनून सगली शान हाये.. नायतर साला सगली हानामारीची कामं कोन करनार?

साह्येब म्हनला त्यादिवशी .. हानामारी, मारामारी दंगाफसाद अन कोनाचा मुडदा पाडने.. सगलं काही ठीक.. पकडला गेला तरबी काय वांदा नाय .. पन त्यातून आपली मानगूट अलगत निकालता आली म्हनजे मग आपली वट वाढते. कायदेको सारी दुन्या डरती म्हनून दुन्या बेकायदेशीर काम नहीं करती. आपन लोक नेते लोक .. आपनच कायद्याला डरलो तर नेता म्हनून काय वट राहनार?

साह्येब असा कदीमदी राजकारनाचे ते काय म्हनतात ते.. तत्वज्ञान सांगत असतो.

एकदा साह्येब आपनला बोल्ला पन, छोटा हकीम.. हिकमत एक चीज होती और दुसरी हिंमत.. तेरेमें दोनों है म्हनून तू मेरा राइट हँड..

मी म्हनलं.. साह्येब, तुमच्याबिगर हा छोटा हकीम शुन्य.. झीरो.. कोनाचा पाठीवर अन डोस्क्यावर हात असला की राडा घालायला अंगात जोश चढतो .. पन त्यासाठी पाठी साह्येबासारखाच कोणी मोठा मानूसच हवा..

आता इथे आपनची चवथी बारी..

इथं हाय म्हनून बोलता येतं. नायतर भायेर आपन लय बिझी. इथं आता काही दिवस निवांत.

साह्येब खुशीत आला की गाना बोलल्यासारखा इंग्रजीत बोलतो..

झाला अरेस्ट.. आता घे रेस्ट!

तर आता थोडे दिवस आराम. बाकी लोकानच्या गाठीभेटी आन नवीन ट्रिक शिकून ताजा होऊन भायेर पडेन साहेबाच्या पायाशी रूजू व्हायला.

मागच्या टायमाला त्या तिकडे होतो. आता जेलर बदलला पन जेलचे सगले पहचानचे झाले. साह्येबाचा मानूस म्हनून इकडे सगले मानतात. अन टर्कून बी असतात.

अशी वट पाह्यजे.

पन साह्येब म्हणतो, जेलात नम्रपने रहा..

जेलरला वाटायला हवं, वाट चुकलेला कुनी हाये. म्हनजे हे कदी उपयोगी पडेल सांगता येनार नाय.

साह्येब म्हनतो म्हनजे खरंच असनार.. तेव्हा जेलामदी दादागिरी बंद.

.. भायेर उधळलेला बईल, आत गेला की गोगलगाय नायतर गायीसारखा शांत..

आत बसला की जिंदगीचा हिसाब मांडत बसतो.

कोण होता आपन?

शाला शिकायची आपनला आवड तर नव्हती. शाला सोडून हकीमाच्या दवाखान्यात अवशदाच्या पुड्या बांदणारा आपन ..

गनपतीच्या दिवसात साह्येबानी हेरला आपनला.. मग..

तिकडून कुटवर यून पोचलो.

साह्येब मोठा होत गेला..

तसा आपन बी मोठा होत गेलो..

झोपडी सोडून चाळीत आला.. मागच्या टायमाला खतरनाक काम केला आपन तर साह्येबानी पल्सर घ्यून दिली.. ती उडवत फिरतो..

आपनच्या पुऱ्या एरियात साह्येबाचे नाव मोठं.. एकच ते साह्येब.. नंबर वन..

नि त्यामुळे आपन बी.. त्याचे राइट हँड..

पंटर नंबर वन..

बोले तैसा चाले

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले..

असं म्हणतात.

त्या हिशेबाने आम्ही नुसतेच नाही तर परम वंदनीय.

आम्ही बोललो नि तसे केले नाही असे कधी झालेय का?

आमच्या कित्येक वर्षांच्या सार्वजनिक आयुष्याच्या इतिहासात असे कधी घडलेय का?

पुढ्यात एक अन पाठीमागे एक असे आम्हाला जमत नाही.

जे आहे ते समोर आणि समोरासमोर ..

मग परिणामांना सामोरे जाण्यास आम्ही नाही भीत..

आम्ही सांगितलेले,

आमच्या मतदारसंघात पाण्याची समस्या यापुढे नसेल.

आमच्या पुढाकाराने इथे बाटलीबंद पाण्याचा कारखाना सुरू झाला गेल्या वर्षी. आज या कारखान्यात येथील स्थानिक शेतकरी कामाला आहेत. त्यांच्या शेतजमिनींचा असा वापर झाल्याने त्यांना कायम रोजगाराची सोय आम्ही करून दिली आहे.

आणि स्थानिक रोजगाराचा प्रश्न त्यामुळे सोडवण्यात आम्हाला यश आले आहे.

आम्ही असे एकाच वेळी एकात एक प्रश्न सोडवून आमची वचने पाळत असतो..

आम्ही सांगितलेले गावात नळ सगळीकडे येतील. आज घर तिकडे नळ आहे.

वस्ती वस्तीतून नळांच्या लायनी आहेत.

आमचे पाईप आणि नळ उत्पादक कंपनीशी साटेलोटे असल्याचा आरोप झाला. पण आम्ही बधलो नाही.

.. वचन पूर्ती आम्ही करून दाखवलीच.

आता पुढील काही वर्षांत या नळांतून घरोघरी पाणी देखील येईल.. हे प्रत्यक्ष आमचे वचन आहे.

आम्ही बोललेलो,

आमच्या मतदारसंघात रस्ते बनतील.

बनले. एकदाच नव्हे तर पाचवेळा..

गेली पाच वर्षे आम्ही दरवर्षी नव्याने रस्ते बनवून घेत आहोत.

.. पावसाळ्यात रस्ते वाहून गेले की आम्ही ते लगेच नव्याने दरवर्षी बनवून घेतो.

निवाऱ्याचे समस्येचे निवारण आम्ही करू म्हणालेलो..

आमच्या भावाबहिणींना घरे मिळावीत म्हणून आम्ही झटलो.. झटत आहोत.. झटत राहू..

त्यासाठी किनारपट्टीच्या भागातून नारळाच्या झावळ्यांची सोय आम्ही करत आलो आहोत. त्यातूनच आमच्या गावकऱ्यांच्या झोपड्या शाकारण्याची सोय आम्हीच करून दिली आहे.

आज आमचे मतदार या झावळ्यांच्या छायेत आपली घरे वसवताना पाहून आम्हाला कृतकृत्य वाटते.

विजेबाबतची सुधारणा तर आम्ही अगदी विद्युतवेगाने उपलब्ध करून दिली.

आपच्या शेजारील गावातून जाणाऱ्या वीज वाहिन्यांतून आपल्या गावास वीज उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही विनामूल्य आकड्यांची सुविधा उपलब्ध करून दिली.

आज घर तिथे आकडा.. आणि आकडा टाकेल त्यास वीज ही योजना राबविली जात आहे ती आमच्या पुढाकाराने.

.. यामुळे गावकऱ्यांना वीज तर मिळालीच. त्याचप्रमाणे त्याबरोबर वीजबिलात ही प्रचंड बचत झाली.

.. आधी म्हटले तसे, आम्ही एकात एक प्रश्न असे सोडवित असतो.

अन्न वस्त्र निवारा..

वीज रस्ते नि पाणी ..

सर्व बाबतीत आम्ही दिलेली वचने आम्ही पाळत आलो आहोत. वचनें किं दरिद्रता असे आम्ही शाळेत शिकलेलो.. नि बोले तैसा चाले.. हे ही. आमची जवळीक दुसऱ्या सुभाषिताशी..

बारकाईने पहा की वरवर निरीक्षण करा .. आम्हाला वचनपूर्तीचा आनंद आहे..

समाधान आहे..

आम्ही म्हणालेलो..

आम्ही विकास घडवणार..

घडवला..

आणि विकासचाही विकास आम्ही घडवणार.. तुमच्या म्हणजे मायबाप मतदारांच्या कृपेने..

म्हणजे गावचा तो सारा विकास तुमच्या डोळ्यादेखतच झालेय.. पुनरूक्ती कशाला?

पण आता आमचे ज्येष्ठ सुपुत्र विकास यांना मतदारांच्या पायी घालत आहोत.

.. आम्ही घडवलेला विकास सर्वांसमोर असा आहे.

आपणा सर्वांच्या कृपेने आमच्या विकासचा विकास ही घडून येईल.

आम्ही बोलतो तसे करून दाखवतोच..

.. त्यासाठी अजून काही दाखला द्यायलाच हवा का?

उचलली जीभ..

‘काहीतरीच.’

‘शोभते तरी का?’

‘उगाच कसला तरी आव आणलाय नुसता..’

‘आपली मतं आपल्याकडे ठेवा.’

‘माहितीय.. तुम्हाला आपल्या संस्कृतीचा अभिमान म्हणून मुळीच नाही.’

‘अरे.. ही काय पोस्ट झाली? राष्ट्राभिमान म्हणून काही गोष्ट असते की नाही?’

‘जनाची नाहीतर मनाची तरी..’

‘थोडा विचार करून टाकत जा.. पोस्ट.’

‘उगाच उचलली जीभ लावली टाळूला नको..’

हे काय आहे विचारता?

अहो, मी फेसबुकावर दिलेल्या वेगवेगळ्या पोस्टवरच्या सडेतोड प्रतिक्रिया आहेत.

सडेतोडच अगदी.

माझे विचार सुस्पष्ट असतात.

उगाच गुळमुळीत बोलत नाही मी कधी की लिहित नाही.

फेसबुकावर कुणी काहीही कसे टाकतात?

तेही देशविरोधी नि संस्कृती विरोधी असेल ना तर तळपायाची आग मस्तकात जाते माझ्या.

मग मी पुढे मागे नाही पहात..

आगा नाही पिछा नाही..

क्षणभराचाही विचार न करता मी त्या लिहिणाऱ्यास करतो गारद..

एक घाव अन दोन तुकडे एकदम.

नाही म्हणजे विचार न करता कुणी कसे काही लिहू शकतात?

अहो, या लोकांना असेच पाहिजे.

वचक हवा कोणाचा तरी.

नाहीतर चेकाळतील.

मला तर असे काही दिसले ना की क्षणभराचा विलंब न करता त्यांना त्यांची जागा दाखवून देतो.

अशा लोकांना असेच पाहिजे.

अशा लोकांना म्हणजे कोणाला काय विचारताय?

अहो तेच.

उचलला अंगठा नि लावला मोबाईलला ..

लिहिली पोस्ट आणि टाकली फेसबुकला वाले.

नाही म्हणजे त्यांनी लिहावे,

अहो, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा भला भारदस्त शब्द आहे त्यासाठी.

पण काय लिहावे हे तरी विचार करून ठरवावे.

उगाच याच्या विरूद्ध, त्याच्या विरूद्ध काहीही लिहावे?

आम्ही बरे सहन करू?

अहो देशभक्ती काही आहे की नाही?

आणि आपल्या संस्कृती नि परंपरांबद्दल काही .. प्रेम बिम तर सोडा.. पण नुसती चाड तरी?

आले यांच्या मना.. मग ते कोणाचे ऐकेना.

करा सणावारांवर टीका..

करा परंपरांवर टीका..

करा प्राचीन प्रथांवर टीका..

कुणी तर आमच्या देवदेवतांची थट्टा करतो..

कुणी जुन्या ग्रंथातील परंपरा अनिष्ट म्हणून काहीही बरळतो..

कुणी आमचे संस्कृती संवर्धन होताना दिसले की अस्वस्थ होत काहीबाही लिहितो..

कोणी आमच्या प्रिय नेत्यांवर टीका करतो..

तर कोणी कोणाच्या धोरणांवर..

काय काय म्हणून ऐकून घेणार मी?

ते दिवस गेले जेव्हा मी मूक प्रेक्षक होतो. निमूटपणे ऐकून घेत होतो..

आता नाही ..

ते उचलून लावत असतील जीभ टाळूला..

तर तशी जीभ मला ही आहे,

तसाच टाळू मला ही आहे

नि ती जीभ मला उचलता ही येते

नि टाळूस लावता ही येते!

रूढी, परंपरा, संस्कृती नि देश टिकवून ठेवायचे तर मला हा देशभक्तीचा वसा घ्यायलाच पाहिजे..

तसा मी विचारी आहे..

पण काही चुकताना दिसले ..

चुकताना म्हणजे मला ते बरोबर नाही असे वाटले तर..

जशास तसे..

मी आहे,

माझी जीभ आहे..

नि माझा टाळू आहे..

उचलतो ती जीभ नि लावतो टाळूला..

सोडतो की काय?

मी.. लोकशाही!

काय सांगायचं?

म्हणतात की दुनिया झुकती है. झुकानेवाला चाहिए.

मला सांगा झुकणारे किती

आणि

झुकवणारे किती?

म्हणजे झुकवणारे थोडे.. झुकायला तयार असे फार!

आता झुकायला तयार कोणी नसतील तर?

झुकानेवाल्याला काय करता येईल?

कितीही त्याने केला आटापिटा तरी जोवर झुकनेवाला झुकने के लिए तैयार नहीं तोवर झुकानेवाल्याचा नाइलाज!

वर तोरा असा की झुकानेवाला चाहिए!

म्हणजे तो वरचढ!

तर मी म्हणतो..

आम्ही पहिल्या वर्गातले..

लवचिक आणि सदा वाकण्यास तयार!

अगदी साष्टांग नमस्कार किंवा प्रणिपात.

दोन हात जोडून ..

कमरेत वाकून..

पाया पडून

दंडवत ..

नमस्कार ..

लोटांगण देखील!

वा! काय तो तोरा!

समोरच्या वाकवणाऱ्यास वाटतेय..

तोच शक्तिमान.. सर्वशक्तिमान.

हाताला दोरी बांधून कठपुतली नाचवतोय..

बच्चे लोग बजाव ताली म्हणत चक्क!

मी मात्र सदा नम्र. विनम्र.

जी हुजूर नि

होय साहेब म्हणत.

चेहऱ्यावर लाचार हसू आणत..

घेणाराचे हात हजार जाणत..

मनातल्या मनात देणाऱ्याच्या गैर समजुतीला हसत..

वाकतो मी.

सर.. सर.. करत सरपटतो मी ..

वाकेन मी पण मोडत नाही.

बचेंगे तो और भी दूसरे के सामने और भी वाकेंगे असा बाणेदार बाणा माझा.

साहेबाला त्याचा अहं सुखावून घेऊ देणे.. हे माझे कर्तव्य .. परम कर्तव्य!

शेवटी काय साहेब खूश तर आपण खूश

खरेतर

साहेब नाखूश तर तो आपल्याला कसला खुशीत राहू देणार आहे?

मोठमोठे संत महात्मे सांगून गेलेत..

जीवनाचे अंतिम ध्येय आणि

अंतिम सत्य..

आनंदी राहणे..

तर साहेब आनंदी तर आपण परमानंदी!

अशा वाकणाऱ्यांच्या फौजा पाहून साहेबाला परम सुख लाभते..

एखाद्या सिनेमातल्या खलनायकासारखा साहेब अक्राळविक्राळ हसतो..

म्हणतो,

दुनिया झुकती है.. झुकानेवाला चाहिए ..

माझ्यासारखे सत्य जाणणारे हे जाणून आहेत..

साहेबासमोर झुकण्यात कमीपणा नाही.

शेवटी तो साहेबच आहे.

आपल्या वाकण्या झुकण्यातूनच त्याचे साहेबपण सांभाळले जाणार आहे.

त्यातूनच त्याला सर्व शक्तिमानतेचा आभास होणार आहे..

त्यातूनच त्याला तो झुकवणारा आहे याची पटणार आहे खात्री..

आपण एकच करायचे..

लवून

वाकून

लोळून

कसाही कुर्निसात करायचा..

साहेबाला खुश करायचे..

शेवटी झुकनेवाला समोर असेल तरच झुकानेवाल्याला किंमत ..

साहेब त्याच्या तोऱ्यात हे विसरला तरी आपण विसरत नाही ..

साहेब समजतो आपल्याला कठपुतळी ..

साहेब समजतो स्वतःस झुकानेवाला..

मनात समजून उमजून घ्यायचे..

आहे याच्या अगदी उलट..

बहुसंख्यांकातील मी..

साहेबाला न झुकता झुकवणारा..

त्याच्या नकळत!

लोकशाही म्हणून काही असते की नाही?

मी आपली ताकद समजून आहे..

झुकवणारा मी..

झुकवणारा मीच..

पण झुकणाऱ्याच्या वेशात..

कारण मला ठाऊक आहे..

शेवटी काय..

दुनिया झुकती है..

झुकानेवाला चाहिए!

वंगण

मी.. सर्वांच्या ओळखीची..

कुणी मला लाच म्हणतात ..

कुणी लुचपत..

नाही, मी आहे अगदी बाळसेदार..

लुचपत म्हणाले म्हणून काय खितपत पडणारी मी नाही..

मला कुणी चायपानी म्हणतात

कुणी खिसा गरम म्हणतात

कुणी पैसे खाणे म्हणतात..

तर कुणी हात ओले म्हणतात!

हे थोडेसे त्या भगवंतासारखे झाले..

कुणी राम म्हणा कोणी रहिम..

मी एकच आहे.

तर मी लाच!

अशी उघडपणे कशी भेटतेय विचारताय?

विचारा!

तशी मला भीती कशाची नाही.

मी म्हणजे पैशाचा ओघ..

एकीकडून दुसरीकडे जाणारा.

त्या नैसर्गिक प्रवाहास कुणी बांध घालू शकणार आहे?

मी आहे..

माझे अस्तित्व सर्वांस मान्य आहे..

माझी उपयुक्तता सर्वांनी जाणली आहे..

सारे काही कसे सुरळीतपणे सुरू आहे..

पण..

पण माझे असणेच नाकारणारे लोक आहेत आजूबाजूस..

मी नसल्याचे सांगून आपली पाठ थोपटून घेणारे महाभाग धुरीण आहेत आजूबाजूस..

मी असल्याचे वैषम्यच कित्येकांना..

त्या अदृश्य निराकार भगवंताच्या अस्तित्वाबद्दल छातीठोक सांगणारा माणूस प्राणी मी दृश्य साकार असूनही माझे अस्तित्व नाकारत असेल तर माझे हृदय किती विदीर्ण होत असेल?

पण नाही,

मी अशी हरणार नाही.

तशी मी युगानुयुगे टिकून आहे.

मी ताकदवान..

इतिहासकालीन फंदफितुरीपासून मी आहे.

मी इतिहास घडवला आहे आणि

बिघडवलाही आहे..

माझ्या असण्याला नि माझ्या ताकदीला कोणी बांध घालू शकणार आहे?

हां.. तो बांध बंधारा बांधायचा वादा करून कोणी सत्ताधीश होऊ शकतो.

मी नसल्याचेच सांगून आपली खुर्ची बळकट करू शकतो..

तेवढाच माझा सदुपयोग!

म्हणजे मी असताना जेवढे काम करते त्याहून जास्त मी नसल्याचा कांगावा करून कार्यभाग साधून घेतात युक्तीबाज ..

अर्थात अशा युक्तीनेच ते तिथवर पोहोचले असतात..

पण तुम्हाला सांगते, माझे अस्तित्व नाकारण्याची फॅशन असेलही..

पण मी म्हणजे वंगण आहे.

समाजपुरूषाला माझी नितांत गरज आहे.

माझ्याशिवाय ही समाजयंत्रणा चालेल?

सारी चाके एकात एक अडकतात.. तेव्हा प्रत्येक चाकाला फिरवण्यासाठी मीच हवी.

मी नसेन तर चाकांचे एकमेकांवर किती घर्षण होईल याचा विचार करा..

मी समाजशक्तीचा अपव्यय टाळणारी शक्ती आहे.

सारी कामे सुरळीतपणे पार पाडणारी एक सुपर पॉवर आहे मी..

कुणी निंदा कुणी वंदा..

आपले काम चोख बजावणारी आहे मी..

मग कुणी काहीही म्हणो..,

माझी कितीही बदनामी करो..

मी निष्काम कर्मयोग्यासारखी..

आपले काम करीत राहणार!

मग ती देणाऱ्याचे काम घेणारा प्रत्यक्षात करो की न करो!

करण्याची आश्वासने मात्र देत राहणार!

मी आहे लाच.. आणि माझे स्थान मलाच माहिती आहे!

आम्ही चमच्यांच्या फौजा..

काय म्हणता?

ओळखत नाहीत?

काय मजाक करताय भाऊ?

मी सर्वव्यापी ..

सर्व चराचर व्यापून दशांगुळे उरेन असा..

सर्वव्यापी.

माझ्यामुळे आमचे श्रेष्ठी..

म्हणजे माझ्यामुळे ते ज्येष्ठ आणि श्रेष्ठ..

नाही, तसे ते ज्येष्ठ असायची गरज नाही नि श्रेष्ठ असायची ही नाही..

पण मी असल्याने त्यांना तसे वाटायला लागते!

म्हणजे त्यांच्या तसे असण्यात

किंवा

त्यांना ते तसे आहे असे वाटण्यात

माझा मोठाच हात आहे.. म्हणजे असतो.

मी त्यांना सर म्हणतो

साहेब म्हणतो

मालक म्हणतो

धनी म्हणतो..

बाईसाहेब नाहीतर मॅडम म्हणतो.

मी त्यांचे तोंड फाटेस्तोवर कौतुक करतो..

मी त्यांची प्रत्येक गोष्ट कशी योग्य नि एकदम परफेक्ट आहे ते सांगत फिरतो..

त्यांच्या निर्णयक्षमतेचे कौतुक मी नाहीतर कुणी करावे?

त्यांचे गुणगान मी नाहीतर कुणी करावे?

मी त्यांना नेता मानतो

मी त्यांना त्राता मानतो..

कधी त्यांना अवतार म्हणतो..

कधी देवदूत तर कधी तारणहार म्हणतो ..

मी इतक्यावरच थांबत नाही..

मी ते सर्वांस सांगतो..

अलम दुनियेत डंका पिटतो..

असलेल्या नसलेल्या गुणांचा वर्षाव त्यांच्यावर करतो..

त्यांच्याशिवाय मला जगाची कल्पनाही कशी करवत नाही ..

मला प्रश्न पडतो..

त्यांच्याशिवाय आम्हा पामरांचा उद्धार कोण करणार?

आम्हाला त्राता कोण?

आमचा वाली कोण?

आमचा उद्धार करणारा तोच तो एक..

ईश्वरी अंश असणारा..

नेता, त्राता, रक्षण कर्ता.. तारणहार ..उद्धार कर्ता.. कर्ता करविता.

मी त्यांचे गुणगान करताना थकत नाही ..

त्यांची आरती म्हणून मी सर्वांस त्यांची महती वर्णितो ..

त्यांचा नखाची सर यावी म्हणून मी त्यांच्या चरणी लीन होतो..

त्यांची एकही चूक होत नसल्याचे मला ठाऊक आहे..

.. म्हणून मी त्यांना सदैव होकार भरतो..

कुणी त्याबद्दल मला होयबा म्हणेल याची पर्वा मी करत नाही ..

उलट अशा दैवी अवताराचा पाईक असण्याचा मला अभिमान वाटून ऊर भरून येतो.

मला त्यांच्या विरोधी लोकांबद्दल भयंकर संताप वाटतो..

अशा दैवी व्यक्तीला विरोध कुणी कसा करू शकतो?

नाही, मला कीव नाही येत त्यांची..

निव्वळ राग येतो.. संताप ..

अगदी तळपायाची आग मस्तकात जाईल असा..

अशा नतद्रष्टांमुळे होणाऱ्या नुकसानामुळे मला अशांबद्दल चीड वाटते..

पण मी गप्प नाही बसत..

ना ना प्रकारे मी त्यांची तोंडे बंद करू शकतो.. शकतो म्हणजे करतोच..

आपल्या धन्याची सेवा करून धन्य वाटून घेणे.. ही माझ्या आयुष्याची इति कर्तव्यता..

त्याचा मला गर्व आहे.. अभिमान आहे..

मग मला कोणी काहीही का म्हणेना?

कुणी म्हणे होयबा

कुणी म्हणे लाचार..

कुणी म्हणे चमचा

कुणी म्हणे काही

तर कुणी म्हणे काहीबाही ..

काही म्हणा..

काटा म्हणा की सुरी

की म्हणा चमचा..

मला फरक नाही पडत..

आणि मी एकटाच नाही..

माझ्याबरोबर अजून कितीतरी आहेत..

आमच्यातही पळा पळा कोण पुढे पळे तो म्हणून स्पर्धा आहे..

.. तरी आमच्यात एक गोष्ट समान आहे..

आम्ही सारे एक आहोत..

म्हणजे कुणी म्हणेल एका माळेचे मणी आहोत..

म्हणोत..

मी तर बेलाशक आणि अभिमानाने म्हणेन ..

आणि आम्ही चमच्यांच्या फौजा..

सत्य ..

मी कोण?

खरे सांगतो.. शपथेवर सांगतो..

शपथेवर सत्य सांगतो.. आणि सत्याशिवाय दुसरे काहीही सांगत नाही ..

पण नाही. तुमचा विश्वास नाही बसणार.

तुमचा विश्वास माझ्यावर सहजासहजी बसेलच कसा?

नाही म्हणजे मी कोणी अफवा नाही.

मी कोणी कोण्या बातमीदाराने आकसाने म्हणा की पैसे देऊन म्हणा दिलेली बातमी नाही.

मी म्हणजे कोण्या राजकारण्याच्या तोंडून चुकून किंवा मुद्दामहून बाहेर पडलेला शब्द नाही.

ना ही मी कुठे पेड न्यूज म्हणून छापून आलेली प्रिंट न्यूज आहे.

मी हे सर्व नाही ..

.. तर तुमचा विश्वास बसणार कसा?

नाही म्हणजे तुम्हा लोकांना कसे चटपटीत नि चमचमीत काही दिसले की ते चुरचुरीत आणि चकचकीत सत्य वाटते.

ते असते ते कपड्यांच्या आवरणात झाकलेले.

कुणी त्यास अंगडी टोपडी घालतात.

कुणी त्यास अगदी भारीतील वूलन नाहीतर सिल्कची भरजरी वस्त्रे ल्यावयास लावतात.

कुणी त्यास अगदी ओळख न पटावी असा मेकअप करवून पेश करतात.

सर्वांना त्याच्या बाह्यरंगात रस असतो.

अंतरंगी पाहण्याची तशी गरज नसते फार.

पण काही असो..

त्याचे रूप आकर्षक..

बाह्यांग आकर्षक..

चटपटीतपणात पुढे..

आणि वर्ड आ ॅफ माऊथ म्हणतात ना तशी प्रसिद्धी झटकन मिळते त्यास..

अगदी जनसामान्य आवेगाने विद्युत वेगाने त्यास पुढे पोहोचवतात..

तिथे मग माझे काम काय?

मी अंग चोरून बाजूस..

त्या भरजरी वस्त्रांकितांसमोर मी..

लक्तरे ल्यायलेले..

बाकी सर्व गोड

किंवा कदाचित गोग्गोड ..

किंवा चवदार .. मसालेदार आणि

चविष्ट!

मी कडू..

कडूजार किंवा कडवट..

पण मी असतेच..

म्हणजे मला मरण नाही म्हणतात..

नि माझा विजय ठरलेला असेही म्हणतात..

म्हणतात म्हणजे असणार तसेच!

पण डे टु डे मध्ये माझ्याकडे ढुंकून पाहायला वेळ आहे कोणाकडे?

लोकांसमोर मी म्हणून ज्यास किंवा जिस आणले जाईल त्यास किंवा तीस लोक मी असल्याचे मानतात..

माझा विजय ठरलेला..

पण तो शेवटी..

सगळे काही पर्याय संपले की लोक माझ्याकडे वळण्याचा विचार करतात म्हणे..

मी तिथेच आजूबाजूस असते.

बघणाऱ्यास दिसते..

त्यापेक्षा खरेतर खरे काय ते बघण्याची इच्छा असणाऱ्यास दिसते..

अंतिम विजय माझाच म्हणे..

पण हा शेवट आधी होतो मग माझा विजय होतो..

..की माझा विजय झाला की शेवट होतो?

कोणास ठाऊक!

खरी गोष्ट एकच आहे..

मी सत्य आहे..

होय .. तेच सत्य, ज्याबद्दल सारे कळवळून बोलतात.

साधू संत ज्याची कास धरावयास सांगतात तेच सत्य ..

सत्यमेव जयते म्हणतात.. ते सत्य ..

ज्यास मरण नाही, ते सत्य..

आपल्या रूपड्यात वेश बदलून गोंडस स्वरूपात उभे असणाऱ्या असत्यांच्या कळपात अंग चोरून उभे असलेले ..

एक सत्य!

मला ठाऊक आहे तुमचा असा विश्वास बसायचा नाही ..

म्हणजे सत्य सत्य म्हणतात ते मीच यावर नाहीच बसणार विश्वास ..

कारण ..

माझा विजय असा तसा इतक्यात काही व्हायचाच नाहीये ..

कारण अजून शेवट आलेला नाही ..

शेवट येईल नि तोवर टिकून राहिलेले मी..

.. तर ते एक सत्य..

ते एकच सत्य..

आणि तेच एक सत्य!

इन्स्टंट देशभक्त

आजकाल किती सोपे झालेय नाही?

नाही म्हणजे पूर्वी काय होते ना की देशभक्ती वगैरे साठी कुठे कुठे काय काय करावे लागायचे. अगदी पारतंत्र्यात तर अजूनच कठीण होतं ते.

लोक मोर्च्यात काय जायचे, सरकार विरोधी घोषणा काय द्यायचे..

कुणी लोक भावना चेतवण्याच्या नावाखाली भाषणे ठोकायचे.

पेपरातून टीका टिप्पणी काय नि सत्याग्रह काय.. सभा संमेलने काय..

त्यातील काही धाडसी तुरुंगात वगैरे जायचे. स्वातंत्र्य दृष्टिपथात आले तेव्हा तर काही द्रष्टे पुढे मागे नेते म्हणून मिरवण्यासाठी तुरूंगात गेले म्हणे.

असतील.

किंवा नसतील ही.

हल्लीची पिढी आमची. ऐकून माहिती.

नाही म्हणजे तसा इतिहास ठाऊक आहे आमच्या पिढीला.

आम्हाला हवा तसा तो आम्ही ठाऊक करून घेतो.

आम्हाला हवा तसा त्याचा अभिमान बाळगतो.. कधी कधी मिरवतो देखील.

आणि आमच्या गर्वाचे घर कधी खाली येत नाही ..

तर सांगत होतो ते सुलभीकरणाबद्दल..

प्रगती झाली तसे सारे काही सुलभ सोपे होते गेले. होणारच. त्यासच तर प्रगती म्हणतात ना? ज्ञान पुढे गेले.. विज्ञान पुढे गेले..

नुसते सज्ञान ही आता विद्वान म्हणून गणले जाऊ शकतात इतका प्रगतीचा पल्ला गाठला गेला.

कराग्रे माहितीचा साठा आला.

एका बोटाच्या क्लिकवर सर्व ज्ञान विज्ञान तंत्रज्ञान आले..

ते व्यासंगाचे दिवस मागे पडले.

चारशे बुके वाचून वाचस्पती म्हणवणाऱ्यांचा तोरा पार उतरला.

हळद पिऊन इन्स्टंट गोरे होण्याचा सुलभ सोपा मार्ग आला.

वेग वाढला.

आमच्या पिढीचा आवेगही वाढला..

सारे काही डिजिटल होण्याचा जमाना आला.

सारे काही क्षणार्धात.

सारे काही इन्स्टंट.

त्यात मग आमची देशभक्ती कशी मागे राहणार?

इन्स्टंट देशभक्तीचे पर्याय उपलब्ध झाले..

कुणी त्यास कुत्सितपणे आर्मचेअर पॅट्रिया ॅटिझम म्हणून हिणवू लागले..

ते तेच असणार जुन्या जमान्यातील..

आपल्या तपस्वीपणाचा तोरा मिरवत देशभक्तीचा दिंडोरा पिटणारे.

आपल्या ज्ञानी असण्याचा गर्व करणारे ..

त्यांच्या गर्वाचे घर कधी न कधी खाली यायचेच होते.. ते आले.

पण आम्ही त्यांना नाही भीक घालणार..

आता आम्ही त्यांच्या तोडीचे..

नव्हे तर त्यांच्याहूनही पुढे गेलेले देशभक्त.

आम्ही सकाळ पासून रात्रीपर्यंत असतो ते कराग्रे देशभक्ती चिटकवून.

मग ते तंत्रस्नेही फेसबुक इन्स्टा नि ट्विटर नाहीतर विद्यापीठतुल्य व्हाॅटस्ॲप असो..

प्रभातसमयी पूर्वी प्रभातफेऱ्या निघत.

आम्ही प्रभातसमयी डिजिटल फेरी काढतो.

आम्ही गुगलाधारित ज्ञान गंगेत डुबकी मारून सकाळी शुचिर्भूत होतो.

एकेक करून सारे वाचून एकेका विरोध मताच्या चिंधडया उडवतो.

आम्हाला वर्ज्य काही नाही.

इतिहास भूगोल नागरिक शास्त्रापासून राजकारण धर्मकारण..

भौतिक रसायन जीव शास्त्रापासून ते त्या साऱ्यांस पुरून उरणारे ज्योतिष शास्त्र..

आमचा अभिमान नि गर्व गल्ली पासून दिल्लीपर्यंत ओसंडून वाहात आम्हाला कुठे खुट्ट विरोधी मताचा आवाज आला तर त्यावर तुटून पडण्यास भाग पाडत असतो.

आम्ही त्यावेळी मागेपुढे पाहात नाही.

मागे तर हटतच नाही.

समोर कोण आहे याचा मुलाहिजा आम्ही ठेवत नाही.

या ठिकाणी सारेच समान.

सदैव सैनिका पुढेच जायचे हे आमचे ब्रीद.

सीमेवर सैनिक लढतात तसे आम्ही डिजिटल सैनिक..

जे जे आम्हास राष्ट्र संस्कृती संस्कार धर्म इतिहास रूढी परंपरा रिवाज सणवार इत्यादी विरोधी वाटते त्याविरूद्ध आम्ही मोबाईल परजून उभे ठाकतो.

अगदी अष्टौप्रहर.

सकाळी सुरू झालेला हा देशभक्ती यज्ञ आम्ही निद्राधीन होईपर्यंत चालवतो.

आमच्या या यज्ञात आम्ही आमच्या भावभावनांशी म्हणजे अर्थातच आमच्या देशाशी द्रोह करणाऱ्या साऱ्यांची आहुती देतो.

आमचे कर्तव्यच आहे ते!

कारण शेवटी देशभक्ती म्हणून काही असते की नाही?

देशाचे ऋण म्हणून काही असते की नाही?

आम्ही मागे हटत नाही.

डिजिटल सैनिक म्हणून आम्ही बाह्या सरसावून मग अशा देशद्रोह्यांच्या मागे पडतो..

मग खुशाल म्हणो कुणी यास आमची आर्मचेअर देशभक्ती ..

खरेतर प्रगती प्रगती म्हणतात ती हीच!

आम्ही आणि आमची इन्स्टंट देशभक्ती ..

.. म्हटले ना किती सोपे झालेय आजकाल?

----समाप्त----

डॉ. नितीन मोरे यांची ३९+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.








चक्रमादित्याचा
दरबार
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0


माझा
जन्मठेपेची
कहाणी


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार

डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा

डॉ. नितीन मोरे
प्रीतीची
'प्रेम'
कथा

डॉ. नितीन मोरे
ऐसाभी ही होता है

डॉ. नितीन मोरे

तेवढं सोडून बोला

डॉ. नितीन मोरे











डॉ. नितीन मोरे
मी मेल्याविना बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी

डॉ. नितीन मोरे
मी मेल्याविना बोलते

अंजनेय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याविना बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस

डॉ. नितीन मोरे
'इक्का' गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा

डॉ. नितीन मोरे
ऐसे अक्षरे

जॅक्सन...
Jackson!


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
देव, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ...


सुलट उलट
डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष
डॉ. नितीन मोरे यांचे हे बेचाळीसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४२), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू

शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, बंकटलाल जाजू(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "इ"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)